# माणूस

बुधवार १४ ऑक्टोबर ७०
चाळीस पैसे

## मग हे नवे चेहरे ?

श्रीकाकुलम् कडे...
रोखलेल्या बंदुका । उठलेली जनता
– या अंकी ही लेखमाला समाप्त.

मग हे नवे चेहरे ? कातरलेले ?
या लांबच लांब रांगा ?
माणूसने थेट पाकिस्तान सरहद्दीवर
आपला प्रतिनिधी यासाठी पाठविला.
वृत्तांत लवकरच सादर होईल.
माणूस : दिवाळी अंक

अधिक तपशील पुढील अंकी...



बुधवार १४ ऑक्टोबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : सव्विसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर<br>सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार..

□ आपला ३ ऑक्टोबरचा अंक कालच हाती पडला. अंक वाचनीय आहे निश्चित. परंतु श्री. विजय तेंडूलकर व श्री. सुधाकर राजे यांची अनुपस्थिती चांगलीच जाणवते. निदान त्या तोडीची दुसरी सदरे तरी सुरू करा. 'कातरणे' तितकीशी रंगतदार नाहीत. अॅड. माधव कानिटकरांचे लेख एकदम छानच. दोन दोन चित्रपट परीक्षणांची मुळीच जरूर नाही. त्या ऐवजी दुसरे एखादे सदर सुरू करावे.

३ ऑक्टोबर, ७० कु. सुमती आपटे,
नेरळ

□ ३ ऑक्टोबरच्या अंकातील श्री. अशोक चौधरींनी घेतलेली गोपीकृष्णाची

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

मुलाखत फारच छान वाटली. तसेच विजय वैद्य यांचा अरब संघटनेविषयक माहिती देणारा लेखही उत्कृष्ट आहे. द्विसाप्ताहिकात रूपांतर झाल्यापासून माणूस-ची शान खरोखरच वाढली आहे. कवितांचा अभाव मात्र जाणवतो. तो विचारात घेतला जाईल काय ?

५ ऑक्टोबर, ७० — बाळकृष्ण गंधे, पुणे

# कलेतील जाती-भेद

तीस सप्टेंबर सत्तरच्या 'माणूस' अंकात श्री. अनंत भिडे यांनी लोककवी मनमोहन नातूंच्या गजाननचित्र प्रदर्शनाबाबत मांडलेले परखड विचार वाचले. त्याबाबत काही विचार मांडणे जरूर वाटले.

चित्रांचे रसग्रहण व चित्रांवरील कोरडी टीका यातील भेद श्री. भिडे यांनी जाणून घ्यायला हवा होता. 'संवेदनाशील मनाच्या गाभाऱ्यातून प्रगट झालेल्या चित्रकृती' हे कवीचे म्हणणे लक्षात घेता रसिक प्रेक्षकाने मुक्तपणे त्या गाभाऱ्यातील रंगरेषा पहाव्यात अशी अपेक्षा केवळ रास्त ठरते. प्रेक्षक या पद्धतीने जर ते दर्शन घेऊ शकला तरच कलावंत व प्रेक्षक यांच्यात कलात्मक विनिमय [Communication] होणे संभवते. एरवी प्रेक्षक हा कलावंताच्या अंतरंगासून दूर राहील.

कलानुभव व्यक्त करण्याची वाट कलावंत शोधेल व त्यानुसार काही कलाकृती त्याच्याकडून साकार होतील. पण नंतर त्या कलाकृतींपर्यंत कोणत्या वाटेने पोचायचे ही प्रेक्षकाने तयारी केली पाहिजे. निसर्ग एकच पण 'सर्व्हेअर' त्यातील केवळ उंचवटयांची मापे सांगेल व कलावंत त्यातील अनुभवद्रव्याला रंग वा शब्दांच्या माध्यमाने शोषून घेईल. कलेचा आनंद घेताना हा फरक विसरू नये.

'बंडखोरीनं, ओढाताणीनं कलाकृती निर्माण होतात का?' याचा विचार करताना प्रथम बंडखोरी व ओढाताण हे शब्द एकाच अर्थाने वापरता येणार नाहीत हे लक्षात घ्यायला हवे. कलेतील बंडखोरीत केवळ नवीन आविष्कार-पद्धतीचा आग्रह असतो. सहजस्फूर्तपणं नवीन आकार निर्माण होणार असेल तर ती स्वागतार्ह घटना-ऊर्फ बंडखोरी. पण ह्या क्रियेला 'ओढाताण' हे दूषण वाटते. हा भेद स्पष्ट झाल्यावर बंडखोरीनं कलाकृती निर्माण होते असं उत्तर द्यायला हरकत नाही. कोणतीही कला ही स्थितिशील Static नसते. ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेत नेहमी गतिशील dynamic बनत राहते. त्यामुळेच कला विकसन पावते. 'बंडखोरी' जन्म पावते. कलेच्या प्रांगणात 'जुने ते सोने' असं म्हणणाऱ्यांना कलेची गती पकडता येत नाही.

'हा देव आमचा', 'तो देव तुमचा' असा भेद ज्यांना देव ही कल्पना पूर्णपणे जाणवलेली नाही त्यांच्या बाबतीत. उदा० पंढरीचा वारकरी चर्चमध्ये रमणार

नाही किंवा ख्रिश्चन विठोबाच्या देवळात रमणार नाही. तसंच 'जुना रसिक नवकलेचे देऊळ वेगळे मानून त्याठिकाणी त्याची भाववृत्ती निर्माण होणार नाही. त्याठिकाणी तो केवळ रंग आकारांची चिकित्सा करेल. कलेच्या क्षेत्रातील ही 'नवी जात', 'जुनी जात' अशी हास्यास्पद वर्गवारी केव्हा संपेल ?

सोंडेचा आकार क्षणभर झाकला अशी कल्पना केली असता त्यातून गणपती दिसणार नाही अशी दाट शंका भिडे यांच्या मनात येते. हे अगदी साहजिक आहे. कारण मलासुद्धा माझ्या एखाद्या परिचिताचे नाक कापून व डोळे काढून माझ्यासमोर उभे केले तर मी त्याला ओळखेन का ही दाट शंका येईल. सारांश काय, तर टीकाकाराने कलेचे शल्यकर्म करायचे ठरविले तर केवळ रसभंगाशिवाय काहीच निष्पन्न होत नाही.

'सामान्य प्रेक्षकाच्या सहनशक्तीला कलाजगात वावरताना जबरदस्त ताण सहन करावा लागतो' असं श्री. भिडे म्हणतात ते खरं आहे. पण हा ताण नवकलेतील आविष्कारामुळे निर्माण होतो असं म्हणणे हे अपनिरीक्षण ठरेल. खरे पाहता हा जो ताण निर्माण होतो तो रसिक हा कलाविषयक जुनाट कल्पनांनी भारावून गेलेला असतो म्हणून. त्या कल्पनांचे ओझे दूर ठेवून मुक्तपणे, स्वतंत्रपणे जेव्हा कलाकृतीचा आस्वाद घेणे ज्याला शक्य होते त्याला ताण सहन करावा लागत नाही.

चित्रकलेवर सविस्तर चर्चा करणे अर्थातच या मर्यादेत शक्य नाही.

पण श्री. भिडे यांनी आपले विचार प्रकट करताना नवकला म्हणजे त्यांना काय अभिप्रेत आहे त्याचा स्पष्ट खुलासा करणे आवश्यक होते.

गजानन हा एकच विषय प्रत्येक दिवशी वेगळ्या शैलीत मांडण्यात मनमोहनांच्या प्रतिभेचे सामर्थ्य व्यक्त झाले आहे हे नाकबूल करता येणार नाही.

त्यांच्या चित्रांत काही दोष नाहीत असे नव्हे. 'आमचा देव' 'तुमचा देव' या चालीवर जुनी चित्रकला नवी चित्रकला असे देव-भेद किंवा धर्म-भेद मांडण्यांच्या त्यांच्या अभिनिवेषामुळे हे लिहावेसे वाटले.

९ ऑक्टोबर, ७० विजय कारेकर, पुणे

□ सव्वीस ऑगस्टच्या अंकात 'रोखलेल्या बंदुका उठलेली जनता' या लेखमालेमध्ये बरेच मुद्रणदोष राहिलेले आहेत. टेन्सी अॅक्टचे कलम 38(E) सेक्शन ऐवजी लेखमालेत ३८(३) असे छापले गेले आहे. त्याचप्रमाणे लेखमालेच्या शेवटी 'निझामचा मुलगा मुकर्रमझा' या ऐवजी 'विश्रामचा मुलगा मुकर्रमप्रा' असे चुकीचे छापले गेले आहे. लेखांकाचे सुरुवातीस आग्नेय आशियापासून दक्षिण अमेरिकेपर्यंत' असे छापताना 'दक्षिण' शब्द राहून गेला आहे. कृपया नोंद घ्यावी ही विनंती. कळावे.

४ ऑक्टोबर, ७० अनिल बर्वे, पुणे

# मी म्हणते तसेच झाले पाहिजे

प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांचा स्वभाव किती हेकेखोर आहे हे जाणून घेण्याच्या दृष्टीने उत्तर प्रदेशातील ताज्या घटना बऱ्याच बोलक्या आहेत. आपल्या प्रतिस्पर्ध्याला किंवा विरोधकाला निष्प्रभ करण्यासाठी, त्याच्यावर मात करण्याचे राजकीय नेत्याने चातुर्य दाखविले तर ते समजण्यासारखे आहे. परंतु केंद्र सरकारची सूत्रे आपल्या हाती आहेत आणि विशेषत: राष्ट्रपती आपण म्हणू तसे वागणारे आहेत याचा फायदा घेऊन इंदिरा गांधी यांनी राजकीय संकेत उधळून लावावेत यामागे 'मी म्हणते तसेच झाले पाहिजे' या हट्टाशिवाय दुसरे काहीही कारण नाही.

एखादा सहकारी आपल्या विरोधी गेला की त्याची साधी प्रतिष्ठा देखील ठेवायची नाही हे इंदिरा गांधी यांनी सव्वा वर्षापूर्वी श्री. मोरारजी देसाई यांच्या बाबतीत दाखवून दिले होते. काँग्रेस महासमितीच्या बंगलोरच्या अधिवेशनामध्ये राष्ट्रपतिपदाचा उमेदवार निवडण्याच्या वेळी आपला पराभव होताच 'याचे परिणाम ठीक होणार नाहीत' अशी बंगलोर सोडण्यापूर्वीच इंदिरा गांधी यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना जाहीर दमदाटी दिली होती. ही धमकी खरी करून दाखविण्यासाठी त्यानी मोरारजीभाईंकडील अर्थखाते काढून घेतले. प्रधानमंत्री म्हणून त्यांना एखाद्या मंत्र्याचे खाते बदलण्याचा अधिकार आहे याबद्दल कोणीच आक्षेप घेणार नाही. परंतु उपप्रधानमंत्र्यांकडील अर्थखाते काढून घेण्यात आलेले आहे ही बातमी आधी वृत्तपत्रांना कळावी आणि त्यानंतर त्यासंबंधीचे प्रधानमंत्र्यांचे पत्र उपप्रधानमंत्र्यांकडे जावे यामागे, नको असलेला माणूस दूर करण्याबरोबरच त्याचा अवमान करण्याचा अट्टाहासही दिसून येतो.

तीच गोष्ट राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीची. श्री. संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीअर्जावर इंदिरा गांधी यांनी स्वाक्षरी केली होती. शिवाय काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री. रेड्डी यांची उमेदवारी जाहीर झालेली होती. परंतु इंदिरा गांधी यांनी पक्षीय शिस्तीचा संकेत झुगारून देऊन श्री. व्ही. व्ही. गिरी यांच्या उमेदवारीचा पुरस्कार करायला प्रारंभ केला. इतकेच नव्हे तर श्री. जगजीवनराम आणि श्री. फकरुद्दिन अली अहमद या आपल्या सहकाऱ्यांमार्फत श्री. संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. यावेळी पक्षाध्यक्ष श्री. निजलिंगप्पा यांना दिलेली वर्तणूकही स्पृहणीय नव्हती. आपल्याशी न जमणाऱ्या गटाविरुद्ध त्यांनी उघडउघड भूमिका घेतली असती तर त्यात मुळीच वावगे ठरले नसते. परंतु गेली कित्येक वर्षे आपण ज्यांच्या बरोबर कार्य केले त्यांना सार्वजनिक जीवनामध्ये कोणतीही प्रतिष्ठा उरू नये यासाठी आटापिटा व्हावा यात निकोप राजकारणाचा अभाव आढळतो. या काळात इंदिरा गांधी यांच्या निवासस्थानी त्यांच्या पाठीराख्यांमार्फत दररोज जे

स्वागत–मोर्चे काढण्यात येत होते आणि त्यावेळी इंदिरा गांधी जी वक्तव्ये करीत होत्या त्यातही याच अहंभावाचे पुरेपूर दर्शन घडत होते.

जनसंघावरचा इंदिरा गांधी यांचा राग सर्वश्रुत आहे. परंतु 'जनसंघाला आपला खून करायचा आहे' असा जो त्यांनी आरोप केला होता तो सिद्ध करण्याचे जनसंघ-नेत्यांचे आव्हान मात्र त्यांनी सोयीस्कर रीतीने टाळले.

या घटनांच्या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधी यांनी चरणसिंगांच्या बडतर्फीबाबत जी तातडी केली ती त्यांच्या हेकेखोर स्वभावाशी सुसंगतच म्हटली पाहिजे. चरणसिंग हे काही साधुपुरुष नव्हेत हे खरे. परंतु याच चरणसिंगांनी आपल्या पक्षात प्रवेश करावा यासाठी इंदिरा गांधी यांनी काही कमी खटाटोप केला नव्हता. चरण-सिंगांनी आपले भारतीय क्रांतिदल इंदिरावादी काँग्रेसमध्ये विलीन करायला नकार देताच, त्यांच्या मंत्रिमंडळातील बऱ्याच खुर्च्या अडविणाऱ्या आपल्या पक्षाच्या मंत्र्यांनी चरणसिंग–विरोधी पवित्रा घ्यावा असा इंदिरा गांधी यांनी आदेश दिला. मंत्रिमंडळामध्ये पेचप्रसंग निर्माण करण्याचे इंदिरावादी काँग्रेसच्या मंत्र्यांकडून प्रयत्न सुरू होताच चरणसिंग यांनी त्यांच्याकडून राजिनामे मागितले. त्याऐवजी या मंत्र्यांनी चरणसिंगांकडेच राजिनाम्याची मागणी केली. येथपर्यंतच्या पक्षीय डाव–प्रतिडावांबद्दल तिऱ्हाईताला तक्रार करण्याचे कारण नाही. परंतु त्यानंतर इंदिरा-वादी काँग्रेसने राज्यपालांची मदत घेतली. वस्तुत: राज्यपाल हे राष्ट्रपतींचे म्हणजे केंद्र सरकारचे प्रतिनिधी असले तरी केंद्र सरकारची धुरा सांभाळणाऱ्या पक्षाचे हस्तक होण्याचे त्यांना काहीच कारण नव्हते. परंतु इंदिरावादी काँग्रेसच्या मंत्र्यांनी मागणी करताच, राज्यपालांनी चरणसिंगाना राजीनामा द्यायचा आदेश दिला.

चरणसिंग यांना विधानसभेत बहुमताचा पाठिंबा आहे की नाही यावरच त्यांचे मुख्यमंत्रिपद अवलंबून होते. त्यासाठी त्यांनी सहा ऑक्टोबरला विधानसभेची बैठकही बोलविली होती. या बैठकीच्या वेळी सिंडिकेट काँग्रेस, जनसंघ आणि स्वतंत्र या तीन पक्षांचा पाठिंबा चरणसिंगांना मिळणार आणि त्यामुळे त्यांचे बहुमत सिद्ध होणार याचा अंदाज येताच इंदिरा गांधी यांनी या बैठकीपूर्वीच चरणसिंगांना बड-तर्फ करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी राज्यपालांकडून उत्तरप्रदेशात राष्ट्रपतींची राजवट जारी करावी असा अहवाल येईल याची व्यवस्था केली आणि त्याप्रमाणे तो अहवाल केंद्रीय गृहखात्याकडे येताच उत्तरप्रदेशात राष्ट्रपतींची राजवट अमलात आणायचा निर्णय करण्यात आला. परंतु राष्ट्रपती यावेळी रशियाच्या दौऱ्यावर गेलेले होते आणि या निर्णयावर त्यांच्या स्वाक्षरीचे शिक्कामोर्तब होणे आवश्यक होते. त्यासाठी केंद्र सरकारचा प्रतिनिधी विमानाने किएव्ह येथे धाडण्यात आला. राष्ट्रपतींची स्वाक्षरी घेऊन तो दिल्लीला परतताच उत्तरप्रदेशात राष्ट्रपतींच्या राजवटीचा पुकारा करण्यात आला.

उत्तरप्रदेशात राष्ट्रपति–राजवटीची कार्यवाही करायला, राष्ट्रपती मायदेशी परतेपर्यंत वाट पहाणे युक्त ठरले असते. जणू काही उत्तरप्रदेशात राष्ट्रपतींची

राजवट तावडतोब जारी करण्यात आली नाही तर आकाश कोसळेल अशा आविर्भावात ही धावपळ करण्यात आली. याचे कारण एकच होते. सहा ऑक्टोबरला विधानसभेची बैठक भरण्यापूर्वी उत्तर प्रदेशातील चरणसिग–राजवटीचे दफन केले नाही तर नव्या सोयरिकीच्या आधारावर चरणसिंग यांची राजवट चालू रहाणार होती आणि इंदिरावादी कॉंग्रेसमध्ये विलीन व्हायला नकार दिलेल्या चरणसिंगांना तशी संधी देणे इंदिरा गांधी यांना साफ नामंजूर होते.

श्री. चरणसिंगांनी नवे मंत्रिमंडळ स्थापन केले तरी त्याला स्थैर्य लाभणार नाही म्हणून आपण राष्ट्रपतींच्या राजवटीची शिफारस केली अशी सबब राज्यपाल श्री. बी. गोपाल रेड्डी यांनी सांगितली आहे. परंतु चरणसिंगांचे नवे मंत्रिमंडळ अस्थिर राहील याचा अंदाज राज्यपालांना, ते मंत्रिमंडळ अधिकारावर येण्यापूर्वीच कसा आला असा प्रश्न उभा राहतो. उद्या असे होईल की केंद्र सरकारला नको असलेले मंत्रिमंडळ, अस्थिरतेची सबब सांगून ते बडतर्फ करण्याबाबतही इतरही राज्यपालांवर असेच दडपण आले आणि राज्यपाल त्याला बळी पडत चालले तर, लोकनियुक्त राज्य–सरकारांच्या अस्तित्वाला अर्थच उरणार नाही. बिहारमधील श्री. दरोगाप्रसाद राय यांचे मंत्रिमंडळ तर प्रारंभापासून अस्थिरतेच्या हिंदोळ्यावर झोकावत आहे. मग बिहारच्या राज्यपालांनी तेही मंत्रिमंडळ, अस्थिर राजकारणाची सबब सांगून बडतर्फ करण्याची केंद्र सरकारला का शिफारस करू नये आणि राज्यपालांनी तशी शिफारस केली नाही तर केंद्र सरकारने उत्तरप्रदेशच्या राज्यपालांवर जसे दडपण आणले तर बिहारच्या राज्यपालांवर का आणू नये या प्रश्नाला प्रधानमंत्र्यांपाशी कोणते उत्तर आहे? श्री. दरोगाप्रसाद राय प्रधानमंत्र्यांच्या पक्षाचे आहेत आणि श्री. चरणसिंग त्यांच्या पक्षाचे नव्हते यासाठी जर हा दुजाभाव करण्यात येत असेल तर, राज्यांच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याचा आपला कधीच प्रयत्न नसतो, या इंदिरा गांधी यांच्या विधानात सत्याचा लवलेशही नाही असेच म्हटले पाहिजे.

परंतु उत्तरप्रदेशात प्रधानमंत्र्यांनी लोकसत्ताक राजवटीची जी मुस्कटदाबी केली त्याबद्दल उत्तरप्रदेशच्या राज्यपालांवर अधिक दोष येतो. राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून राज्यपाल वावरत असतात आणि त्यामुळे घटनेची कार्यवाही नीट होत आहे हे पाहण्याची त्यांच्यावर मुख्य जबाबदारी असते. पक्षीय राजकारणाशी त्यांचा किंचितही संबंध नसतो; निदान असता कामा नये. परंतु उत्तरप्रदेशचे राज्यपाल श्री. बी. गोपाल रेड्डी यांनी यावेळी प्रधानमंत्र्यांच्या इशाऱ्यावर वागणारा एक अधिकारी एवढी मामुली भूमिका स्वतःकडे घेऊन श्री. चरणसिंगांच्या मुख्यमंत्रिपदाला सुरुंग लावला.

यात त्यांनी भारतीय राज्यघटनेचा अधिक्षेप केला आहे आणि तो प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्या आशीर्वादाने केला आहे ही गोष्ट उभयतांना मुळीच भूषणावह नाही.

—सदाशिव पेठकर

आसाम

# तरुणांचा वाढता असंतोष

भारताच्या पूर्व सीमेवरील आसाम हे जरा दुर्लक्षित राज्य आहे. भारताच्या संरक्षणव्यवस्थेत आसामची जागा जरा नाजूकच आहे. पण भारतीय राजकारणात आसामला जवळजवळ काहीच महत्त्व नाही. कदाचित आसामच्या कमी लोकसंख्येमुळे असेल, पण उत्तर प्रदेश, केरळ, प. बंगाल येथे चाललेल्या दारूकामाच्या आतषबाजीपुढे आसामचे म्हणणे काय आहे हे कुणाच्याच लक्षात येत नाही.

आसामात खुद्द आसामीयांनाच स्थान नाही अशी आसामी तरुणांची जुनी तक्रार आहे. बंगाली, मारवाडी, उत्तरप्रदेशी लोकांनी आसामची सारी क्षेत्रे काबीज केली आहेत. अखिल भारतीय राजकारणात कुणा आसामी पुढाऱ्याचे नाव ऐकू येते? फक्रुद्दिन अहमद? ते आसामी पुढारी नव्हेत, मुस्लीम नेते म्हणून इंदिराबाई सध्या त्यांना हरभऱ्याच्या झाडावर चढवीत आहेत असे या आसामीयांचे म्हणणे. 'आसामीयांसाठी आसाम' या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या एका लछित सेनेने काही वर्षांपूर्वी गडबड उडवून दिली होती.

या राज्यात उद्योगधंदे आहेत कुठे? नैसर्गिक साधन-सामुग्रीने अत्यंत समृद्ध असलेल्या आसामात गौहत्तीजवळ असलेल्या एका तेल शुद्धीकरण कारखान्याशिवाय दुसरा नाव घेण्यासारखा कारखानाच नाही. पाकिस्तानातुन प्रचंड संख्येने घुसणारे मुस्लीम, वाढती बेकारी, आसामीयांवर त्यांच्या घरातच होणारा अन्याय यामुळे आसामी तरुण असंतुष्ट आहेत. अधूनमधून त्यांच्या रागाचा स्फोट होतो.

तसा गेल्या आठवड्यात इंदिरा गांधी आसामच्या दौऱ्यावर गेल्या तेव्हा एक बारीकसा प्रकार घडला. आसामात दुसरा तेलशुद्धीकरण कारखाना स्थापावा अशी आसामी युवकांची जुनी मागणी आहे. नाही होय करताकरता गेल्या आठवड्यातच एक संदिग्ध वार्ता प्रसिद्ध झाली होती की आसामात सार्वजनिक क्षेत्रात दुसरा तेलशुद्धीकरण कारखाना काढण्याविषयीचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

श्रीमती गांधी आपल्या आसामच्या दौऱ्यात अधिकृत घोषणा करतील अशी अपेक्षा होती.

परंतु गांधींनी तशी घोषणा केली तर नाहीच उलट कारखान्याच्या बाबतीत कुठलाही निर्णय घेतल्याचे नाकारले. गौहत्तीच्या एका कॉलेजचे विद्यार्थी इंदिराबाईंना मानपत्र देणार होते. प्रधानमंत्र्यांनी कारखान्याला नकार देताच विद्यार्थ्यांनी मानपत्र रद्द केले आणि स्वागत-समारंभातूनही अंग काढून घेतले.

तिकडे आसाम-नागालँड सीमाभागातील गडबड अजून थांबलेली नाही. बंडखोर नागा आणि बॉर्डर सिक्युरिटी फोर्स यांच्यात सतत चकमकी चालूच असतात. आसाममधल्या सगळ्याच नद्यांना नियमितपणे प्रचंड पूर येतो आणि शेकडो हेक्टर पिकांचे नुकसान होते. तसे यंदाही झाले. यंदा शेजारच्या मणीपूरमधल्या नद्यांनाही प्रचंड पूर आले आणि त्या भागाचे अतोनात नुकसान झाले.

◻ पुराच्या तडाख्याने गुजरातला चांगलाच हात दाखविला होता. पुरातून गुजरात जरा डोके वर काढीत आहे तो गुजरातचे मुख्यमंत्री श्री. हितेंद्र देसाई यांना एक अनपेक्षित गोड धक्का मिळाला. स्वतंत्र पक्षातून फुटून निघालेल्या गुजरात प्रजा परिषदेचे सोळा आमदार हितेंद्र देसाईंच्या जुन्या काँग्रेसला येऊन मिळाले. गुजरात विधानसभेत आता सत्तारूढ जुन्या काँग्रेसचे बळ १६८ मध्ये ११० असे सॉलीड झाले आहे. स्वतंत्र पक्षाच्या मदतीने हितेंद्र सरकार पाडण्याची नव्या काँग्रेसची स्वप्ने आता तशीच विरून जाण्यास हरकत नाही. हितेंद्र सरकारचा पाया आता चांगलाच भक्कम झाला आहे.


# व्होल्गा जेव्हा लाल होते

लेखक : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०

¤ पक्षातून फुटून निघण्याचा रोग म्हैसूरमधील नव्या-जुन्या दोन्ही काँग्रेस पक्षांना लागला आहे. नुकतेच म्हैसूर विधानपरिषदेच्या एका जागेची आणि शेतकी विद्यापीठाच्या एका बोर्डाची म्हैसूर विधानसभेतून निवड झाली. सत्तारूढ जुन्या काँग्रेसचे उमेदवार निवडून आले, पण ते क्रॉस व्होटिंग झाल्यामुळे. जुन्या काँग्रेसच्या बऱ्याच आमदारांनी गुप्तपणे फुटून विरोधी मतदान केले असे सांगतात. जुनी काँग्रेस वाचली ती विरोधी पक्षीयांपैकी काही लोकांनी त्यांच्या आमदारांना मते दिली म्हणून. थोडक्यात काय तर फुटीचा रोग दोन्ही बाजूंना लागला आहे. त्यामुळे सारे एकदम सावध झाले आहेत.

¤ नव्या काँग्रेसने तिकडे केरळात एकदम नवा पवित्रा घेतला आहे. निवडणुकीमध्ये सर्वांत जास्त उमेदवार यशस्वी होऊनही पक्षाने सरकारात भाग घेण्यास नकार दिला. पक्ष संघटनेतील एका मोठ्या वजनदार गटाने दडपण आणून कम्युनिस्टांबरोबर सरकार बनविण्यास विरोध केला असे सांगतात. केरळात आताच कम्युनिस्टांशी मधुचंद्र करण्यास सुरुवात केली तर १९७२ च्या निवडणुकांमध्ये पक्षाला मोठीच टीका आणि विरोध सहन करावा लागेल असे या गटाचे म्हणणे आहे. बाहत्तरनंतर केंद्रात कम्युनिस्टांशी सहकार्य करण्याचा प्रश्न आला तर हा गट बंडाचे शिंग फुंकेल असे लक्षण दिसते. आताच नव्या काँग्रेसचा कम्युनिस्टांशी जो लघळपणा चालू आहे तो या गटाला मान्य नाही. केरळात तरी आपल्या पक्षाला कम्युनिस्टांपासून दूर ठेवण्यात हा गट तात्पुरता यशस्वी झाला आहे.

नव्या काँग्रेसने उत्तर प्रदेशात जो पवित्रा घेतला त्याचा सार्वत्रिक निषेध होत आहे. पक्षातील वर उल्लेखिलेल्या गटालादेखील या राज्यातील घटनांनी उद्वेग आला आहे असे बातम्यांवरून दिसते. अगोदर चरणसिंगांच्या भा. क्रां. द.मधून आमदार फोडायचा प्रयत्न करायचा. तो यशस्वी झाला नाही म्हणून चरणसिंगांचे सरकार पाडायचा प्रयत्न करायचा. तेही जमत नाही म्हणून मग केंद्र राजवट लादायची. या प्रकारामुळे सर्वत्र घृणा उत्पन्न झाली आहे. उत्तर प्रदेश आपल्या खिशात घालण्यासाठी प्रधानमंत्री आणि नवी काँग्रेस कोणत्या थराला जाऊ शकतात हे दिसून आले. त्या घटनांचे परिणाम १९७२ च्या निवडणुकांवर निश्चितच होतील.

आताच नव्या काँग्रेसला याचा प्रत्यय येऊ लागला आहे. बिहारचे नव्या काँग्रेसचे दरोगा रायचे संयुक्त सरकार भा. क्रां. द.च्या पाठिंब्यावर उभे आहे. उत्तर प्रदेशातील घटनांना उत्तर म्हणून भा. क्रां. द.चे आमदार आपला पाठिंबा काढून घेण्याचा विचार करीत आहेत. खरे म्हणजे हा वेळपर्यंत त्यांनी पाठिंबा काढून घ्यावयास हवा होता. पण अजून ते विचारच करीत आहेत. त्यांनाही खुर्चीचा मोह सोडवत नाही असे दिसते. आजचे राजकारण किती खुर्चीबद्ध झाले आहे त्याचा हा नमुना.

¤ ¤ ¤

# उलट सुलट चर्चा....

राज्यकर्त्या महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने आपल्या कुटुंबकबिल्यासह सत्ताधारी काँग्रेसमध्ये प्रवेश करावा यासाठी पक्षनेते आणि मुख्य मंत्री श्री. दयानंद बांदोडकर यांच्यावर फार मोठे राजकीय दडपण आणण्यात येत आहे.

वस्तुतः गेल्या दोन निवडणुकांतून गोव्यामध्ये काँग्रेसपक्षाला जगदणीत हार पत्करावी लागल्यानंतर बांदोडकर काँग्रेसप्रवेश करणार असे म्हणण्यापेक्षा येथील काँग्रेस म. गो. पक्षात विलीन होणार असे म्हणणेच अधिक सयुक्तिक ठरेल. विशेषतः प्रदेश काँग्रेसचे विद्यमान नेतृत्व हे संपूर्णतया जनताविरोधी व अनुयायीहीन असल्याने 'केवळ दिल्लीची सत्ता त्या पक्षाच्या हाती आहे म्हणून' ही युती असणार हे जवळ जवळ उघडच आहे.

गेले कित्येक महिने बांदोडकरांच्या काँग्रेसप्रवेशाबाबत मधूनमधून बातम्या यत आहेत. परंतु त्यांच्याच पक्षातील काही लोकांनी बंड केल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीने हे दडपण बरेचसे वाढले असावे असे वाटते. विधानसभेत स्वतःच्या नेतृत्वावर विश्वास संमत करून घेतल्यानंतरही मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यास–नव्या मंत्र्यांची नावे संमत करण्यात राष्ट्रपतींकडून विलंब का लागावा हे एक कोडेच आहे. नायब राज्यपालांनी यादी पाठविण्यास उशीर केला, वगैरे सारे जरी खरे मानले तरी केंद्रीय गृहमंत्रालयातच ही फाईल कुठेतरी अडकून पडली हे उघड आहे.

याच दरम्यान बांदोडकरांवरील भ्रष्टाचाराची न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी 'गोवा मुक्ति आघाडी'ने केली होती याचीही येथे याद येते.

वार्ता अशी आहे की 'तुम्ही काँग्रेसप्रवेश केल्यास तुमच्या सर्व समस्या तडकाफडकी सोडवून टाकू' असे अलिखित आश्वासन दिल्लीकडून श्री. बांदोडकरांना देण्यात आले आहे. बांदोडकर–सरकारला पाठिंबा देणारे यु. गो. प्रागतिक गटाचे सर्व आमदार ताबडतोब काँग्रेसप्रवेश करण्यास तयार आहेत. कारण त्यामुळे गोव्याला स्वतंत्र राज्याचा दर्जा अधिक सुलभपणे मिळेल असे त्यांना वाटते.

मग म. गो. च्या काँग्रेसप्रवेशाचा हा मुहूर्त केव्हा ?

आज तरी ते सांगणे कठीण आहे. 'माझी ध्येयधोरणे काँग्रेसपेक्षा वेगळी नाहीत. काँग्रेस हाच पक्ष मला जवळचा आहे' असे सांगणारे श्री. बांदोडकर आपणहून याबाबत उत्सुकता दाखवीत नाहीत. म. गो. च्या मतदारांचा विरोध लक्षात घेऊन

ही अनुत्सुकता असली तरी माझ्या माहितीनुसार मुख्य कारण वेगळेच आहे. आणि ते म्हणजे प्र. कॉं. चे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम काकोडकर!

या संदर्भात एकदा बांदोडकर म्हणाले, 'जनतेने हाकलून लावलेले असे लोक जोपर्यंत गोवा कॉंग्रेसमध्ये आहेत तोपर्यंत गोव्यात कॉंग्रेस वर येणार नाही. मी कॉंग्रेसप्रवेशाचा विचार करणार नाही.'

तसं पाहिलं तर एक कचेरी व मधूनमधून निघणारी पत्रके आणि श्री. काकोडकर यांच्या पत्रकारपरिषदा एवढे सोडले तर—एवढ्यापुरतीच—गोवा कॉंग्रेस अस्तित्वात आहे. याशिवाय या पक्षाचे कोणतेही कार्य आजतागायत कुणाला माहिती नाही. एखादा बडा नेता दिल्लीहून आल्यानंतर त्यांची कॉंग्रेसकचेरीला भेट होते आणि त्यावेळी चार दोन उद्योगपती व इतर काही अलबत्ये गलबत्ये सोडले तर याही कार्यक्रमांना माणसे येत नाहीत ही वस्तुस्थिती आम्ही नेहमीच पहातो. त्यातूनही आता संघटना व सत्तारूढ असे दोन गट पडल्याने तर या पक्षाची दशा दयनीयच झाली आहे. आणि जी काही फार थोडी त्यातल्यात्यात चांगली माणसे, ती संघटना कॉंग्रेसकडे आहेत. आणि त्यांच्या—काकोडकरांच्या गटातीलही श्री. मोहन नायर आदी सदस्य काकोडकरांच्या बडतर्फीची मागणी करीत आहेत.

एका गोष्टीची गंमत वाटली. श्री. मोहन नायर यांनी अत्यंत गंभीर असे काही आरोप श्री. काकोडकरांवर केले आहेत.

'१९६३ पासून श्री. काकोडकर हेच अध्यक्ष असून हुकूमशाही पद्धतीने ते राहिले आहेत.'

'श्री. काकोडकरांनी हिशेब सादर केले नाहीत.'

'त्यांनी संघटना बदनाम केली.'

'त्यांच्यामुळेच गोव्यात कॉंग्रेस नेस्तनाबूत झाली.'

परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की यातील एकाही आर[illegible] उत्तर देण्या- ऐवजी श्री. काकोडकरांनी हाकाटी चालविली आहे की, 'बांदोडकरांनी राजीनामा द्यावा. बांदोडकरांना मुख्यमंत्रिपदावरून राष्ट्रपतींनी बडतर्फ करावे.' अशीही मागणी त्यांनी केली.

श्री. काकोडकर आणि त्यांची कॉंग्रेस याबद्दल लिहिण्याजोगे खूप आहे. पण तूर्त एवढेच पुरे.

खुद्द म. गो. पक्षाचे काही आमदार कॉंग्रेसप्रवेश करण्याच्या विरुद्ध आहेत.

म. गो. चा सामान्य मतदार बांदोडकरांनी कोणत्याही परिस्थितीतून कॉंग्रेसप्रवेश करू नये असे म्हणतो.

याबाबत श्री. बांदोडकरच एकदा म्हणाले होते की 'असा काही प्रश्न आला तर आमचे कार्यकर्ते, मतदार यांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा केल्यानंतरच मी निर्णय घेईन. मला त्यांचा विश्वासघात करावयाचा नाही.'

अशा या बांदोडकरांचे भारतीय काँग्रेसशी संबंध फार चांगले आहेत. कोणताही दिल्लीहून येणारा नेता त्यांच्याशी–एक नेता म्हणून–चर्चा, बोलणी करतो. आणि ते काँग्रेसमध्ये आल्यास गोव्यात तरी काँग्रेस पक्ष उजळ माथ्याने वावरू शकेल, संघटना अधिक भक्कम होईल, असे या नेत्यांना वाटते. आणि निवडणुका जिंकून काँग्रेसची राजवट आणण्यापेक्षा तयार मंत्रिमंडळालाच काँग्रेसचा टिळा लावणे अधिक सोयीस्कर असेही केंद्रीय नेत्यांचे म्हणणे असावे.

अशा या परिस्थितीत राजकीय दडपणाला बळी पडून बांदोडकर काँग्रेस प्रवेश करणार आहेत का ?

मी याचे उत्तर भविष्यकालाकडे सोपवतो.

## गोवा–नॉट फॉर गोवन्स

नोकरीधंद्याच्या निमित्ताने बाहेरून येथे येणाऱ्या गोमंतकीयेतरांच्या लोंढ्याने आज तरी येथील तरुण वर्ग संत्रस्त झाला आहे.

दिल्ली विद्यापीठाने केलेल्या एका पहाणीनुसार स्वातंत्र्यानंतर १ लाख ५० हजार बिगर गोमंतकीय येथे आले. यापैकी ६० हजार बंदर कामगार असून बाकी इतर नोकरीधंद्यात गुंतलेले आहेत. बहुतेक बँकांच्या शाखा गोव्यात असून त्यामधून काम करणारा ९० टक्के कर्मचारीवर्ग बिगर गोमंतकीय आहे.

गेल्या पाच वर्षात ही आवक अधिक वाढली असून हीच परिस्थिती चालू राहिल्यास नजीकच्या भविष्यकाळात गोवा ‘गोमंतकीयेतरांचा’ होऊन जाईल.

यामध्ये सुमारे एक लाख लोक दाक्षिणात्य आहेत.

सध्या तरी या प्रश्नाला बरीच वाचा फुटली असून वर्तमानपत्राद्वारा अनेक लोक याबाबतचा आपला असंतोष प्रकट करीत आहेत.

याचं एक ताजं उदाहरण वास्को येथे घडलं. बँक ऑफ इंडियाच्या मॅनेजरला शंभर एक तरुणांनी एक दिवस घेराव घातला. गोमंतकीयांची लायकी असताना आमचे हक्क डावलून गोव्याबाहेरची माणसे त्यांनी बँकेत भरती केली हा त्यांचा आरोप होता.

येथील तरुणांच्या मनात तर हा प्रश्न बराच जळजळता असल्याचे समजून आले. परंतु या प्रश्नाचा तेवढ्या गंभीर रीतीने कुणीच विचार केल्याचे दिसले नाही.

‘गोवा फॉर गोवन्स’ असे म्हणणाऱ्या युनायटेड गोवन्स या विरोधी पक्षाला या गोष्टीची जाणीवच झाली नसावी असे वाटते. या पक्षाचे अध्यक्ष डॉ. जॅक सिक्वेरा यांच्या मालकीच्या कोका कोला कारखान्यात ९० टक्के लोक केरळीय आहेत. असा हा आरोप त्यांच्याच पक्षाचे एक आमदार श्री. लोबो यांनी केला.

मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर यांना या समस्येच्या गंभीरतेची जाणीव असावी असे वाटते. कारण येथे येत असलेल्या बिर्लांच्या खतकारखान्यात ८० टक्के

गोमंतकीयांनाच नोकऱ्या मिळाव्यात अशी मागणी त्यांनी केली आहे. परंतु त्यांचेच सरकार आणि त्यांचा पक्ष याबाबत काही करीत असल्याचे दिसत नाही ही लोकांची तक्रार.

शासकीय यंत्रणा तर अशा रीतीने काम करीत आहे की योग्य व लायक असे गोमंतकीय तरुण बाजूला पडून त्यांच्याऐवजी गोमंतकाबाहेरच्यांना प्राधान्य मिळावे. ही तक्रार एका कर्मचाऱ्याचीच. खुद्द गोमंतकीय अधिकाऱ्यांना आपल्या हाताखाली परप्रांतीय हवा असतो कारण तो 'जी हां' करायला तयार असतो.

वास्तविक गोव्यात आज बहुतेक सर्व प्रकारची महाविद्यालये असताना आणि शेकडो तरुण माणसे दरवर्षी त्यामधून शिकून बाहेर पडत असताना कारकुना-सारख्या जागांवर परप्रांतीय बसावेत हे फार विचित्र वाटत असल्याच्या तक्रारी आहेत.

कामगार किंवा मजूर म्हणून आलेले लोक गोव्यातच स्थायिक होणे अधिक पसंत करतात असे एका अधिकाऱ्यानेच परवा सांगितले. आणि याचे कारण विशद करून सांगताना तो म्हणाला, की मोकळी हवा, भरपूर जागा आणि औषधांसुद्धा मोफत वैद्यकीय उपचार हे याचे प्रमुख कारण! बस, रेल्वे स्थानके या ठिकाणी काम करणाऱ्या लोकांची जागा आता बिगर गोमंतकीयांनी घेतली आहे.

गोमंतकीय कामगारापेक्षा तो अधिक 'हार्डवर्कर' असतो असे मत मात्र सर्रास व्यक्त करण्यात आले.

मध्यंतरी 'गोवा सेना' या नावाची एक संघटना याच समस्येवर विचार करण्यासाठी येथे स्थापण्यात आली होती; परंतु आपल्या मताशी प्रामाणिक नसल्या-मुळे असेल किंवा नेतृत्वाच्या अभावामुळे असेल कोणतेच कार्य न करता या संघट-नेचा अंत झाला.

कोणत्याही राजकीय पक्षाने यावर विचार केला नसला तरी येथील विद्यार्थीवर्ग यामुळे आज तरी सचिंत आहे! मागाहून शिवसेनेच्या नावाने खडे फोडण्यापेक्षा आतापासून का नाही याचा विचार होत? असा सवाल एका विद्यार्थीनेत्याने केला. 'आम्हाला अधिक काही नको. लायकी आहे तेवढेच द्या. परंतु आमचे हक्क डावलू नका आणि योग्य अशी माणसे काम करण्यासाठी आमच्याकडे असताना तेथे परप्रांतीयांचा भरणा करू नका.'

'आम्हाला त्यांच्याबद्दल द्वेष नाही. भारतात कोणीही कोठेही जावे. परंतु त्यांच्या स्वतःच्या राज्यात उद्योग-नोकऱ्या मिळत नाहीत म्हणून ते येथे आले. आम्ही कोठे जावे?'

विद्यार्थीनेत्याच्या या प्रश्नाला माझ्याकडे तरी उत्तर कोठे होते?

कोण काय सांगणार?

— विनायक बार्देशकार

कलकत्ता

सौ. तारा पंडित

# आमार दाबी मानते हॉबे... मानते हॉबे

'ए सिटी ऑफ प्रोसेशन्स' – मोर्चांचे शहर – अशी कलकत्त्याची ख्याती. मोर्चे नाहीत असा दिवस जात नाही. उलट लोकांना एखादी मिरवणूक न दिसली तरच चुकल्याचुकल्यासारखं वाटावं एवढा आता सराव झालाय. कधीकधी तर ही मिरवणूक मैलभर लांब असते. ती निघून जाईपर्यंत बाकी सगळी वाहनं चित्रासारखी तटस्थ होतात. चौरस्त्याच्या प्रत्येक कोपऱ्याला लोक तुंबून राहतात. सगळ्यांचं लक्ष संथपणे सरकणाऱ्या नि ललकाऱ्या देणाऱ्या मिरवणुकीवर केंद्रित होतं. कधी-कधी तासभर हीच अवस्था रहाते. पण काही लोक भारी अधीर स्वभावाचे. मिरव-णुकीच्या मधूनच पटकन रस्ता ओलांडायचा प्रयत्न करतात. सगळी मिरवणूक निघून जाईपर्यंत थांबण्याइतकी फुरसद त्यांना नसते. मिरवणुकीतले लोकही कमी चलाख नसतात. ते देखील अशी संधी कोणाला मिळू देत नाहीत. उलट आमची मिरवणूक यांनी पाहिलीच पाहिजे, आम्हाला मूक प्रोत्साहन दिलंच पाहिजे, अशीच त्यांची अपेक्षा असते.

एकदा मात्र गंमतच झाली. अशीच एक भलीमोठी मिरवणूक चालली होती. रस्ता ओलांडायला उभे असलेल्या लोकांमध्ये समोरच एक स्त्री उभी होती. मिरवणूक संपूर्ण निघून जाईपर्यंत थांबण्याइतकी सवड तिला नव्हती. ती मधूनच निघून जाता यावे यासाठी प्रयत्न करू लागली. तिची अधीरता तिच्या चेहऱ्यावर उमटली असावी. मिरवणुकीत जाणाऱ्या एका सदस्याच्या मनात स्त्रीदाक्षिण्य जागृत झालं. त्यानं संकेत केला – 'या माझ्यामागून !' मोठ्या धिताफिने तिला मिरवणुकीच्यामधून

त्याने रस्ता ओलांडून दिला. इकडच्या फूटपाथला आल्यावर तो तिला ढकलून टाकून हळूच म्हणाला– 'बाय द वे...आपण कोणत्या पार्टीचे आहात ?'

'मी ? पार्टी वगैरे काही नाही !'–तिचं उत्तर.

'मग...मग ही लाल साडी ?...'

'लाल साडी ?...ही अशीच...मला आवडते म्हणून !'

'अशीच ?'...त्याच्या कपाळावर आठ्या उमटल्या. तिनं एक जळजळीत कटाक्ष फेकला नि झपझप पाय उचलीत ती निघून गेली. तो मागे फिरला. त्याने रांग पकडली आणि सर्वांच्या आवाजात आवाज मिसळला–'...चोलबे ना चोलबे ना !'

कलकत्त्याला रोजरोज निघणाऱ्या मिरवणुकींचा मजेदार परिणाम झालेला दिसून येतो. मोठ्या माणसांवर नि लहान मुलांवर होणारे परिणाम एकमेकांच्या उलट दिसतात. आम्ही एका मित्राकडे गेलो असताना एका नव्याने कलकत्त्याला आलेल्या पाहुण्याची ओळख झाली. गप्पा रंगल्या. थोड्याच वेळात निदर्शनांचे आवाज कानावर आले–'बांगला देशेर आर एकटा नाम...व्हिएतनाम, व्हिएतनाम !' पाहुण्यांना नवल वाटलं. 'हा आवाज कसला' म्हणून ते विचारू लागले व उठून गॅलरीत जाण्यासाठी चुळबूळ करू लागलें. मित्र म्हणाला, 'बसा हो ! असेल एखादी मिरवणूक. रोजच मिरवणुका निघतात, काय बघायचंय् त्यात !...तुम्ही आपले चहा घ्या...थंड होईल...' मित्राने पाहुण्यांची उत्सुकता दाबून टाकली.

नुकतीच शाळेत जाऊ लागलेली छोटी छोटी मुलं सुटीच्या दिवशी आमच्या वाडीत (बिल्डिंगमध्ये) एकत्र जमतात नि खूप धुडगूस घालतात. त्यांचा सगळ्यात आवडता खेळ म्हणजे मिरवणूक काढणं. तेवढ्या त्या छोट्याशा जागेतच ते हा खेळ खेळतात. एकदा कोवळ्या सुरात तालबद्ध शब्द ऐलू आले–'इन्क्लाब जिंदाबाद, कांग्रेसपार्टी जिंदाबाद...' कुतूहल म्हणून मी बाहेर येऊन पाहिलं. तळमजल्यावरच्या मोकळ्या जागेत ती छोटी बालकं एकामागून एक व्यवस्थित चालत नि तोंडाने वरील शब्द घोकत तिथल्या तिथेच फिरत होती. त्यातल्या सर्वात समोरच्या मुलाच्या हाती एक लहानशी काठी होती अन् त्या काठीवर त्याने घरातलाच एक लाल रंगाचा टेबलक्लॉथचा कपडा टाकलेला होता. मला नवल वाटलं, हसूही आलं. ते छोटे वीर...मिरवणूक म्हणजे एक गमतीदार खेळ अशी त्यांची समजूत असावी. तो झेंडा नि तोंडाने उच्चारलेले शब्द यांचा काही अन्योन्य संबंध असावा याची त्यांना पर्वा नव्हती. फक्त मोठ्यांचं अनुकरण एवढंच त्या खेळाचं महत्त्व !

माझ्या एका मैत्रिणीचं घर अशा रस्त्यावर आहे की त्या घरासमोरून बहुतेक सगळ्याच मिरवणुका जात असतात. तिचा तीन वर्षांचा छोटा मुलगा सगळी निदर्शने काळजीपूर्वक ऐकून लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करतो...एखादेवेळी तो भलत्याच गोष्टीची मागणी करू लागतो. अशावेळी आईने नकार दिला की तो मिरवणुकीत जाणाऱ्या लोकांच्या आवेशात जोरजोराने ओरडू लागतो–

'आमार दाबी मानते हॉबे...मानते हॉबे, मानते हॉबे...' (आमच्या मागण्या पुरवल्याच पाहिजेत.)

आईला नाईलाजास्तव ती वस्तू द्यावी लागते तेव्हाच मुलाने डोक्यावर घेतलेलं घर शांत होतं !

## हाय ! कलकत्ता !

कलकत्त्यात नक्षलवाद्यांचा भारीच धुळसुळाट झालाय. एकदम कुठूनतरी सात आठ जण उगवतात. कुठल्यातरी शाळेत घुसतात, तावदाने फोडतात, ऑफिसमधलं फर्निचर उलटं पालटं करतात; व्यवस्थित ठेवलेलं शालोपयोगी सामान अस्ताव्यस्त करतात; शक्य झालं तर एखादा 'माओ छाप' झेंडा किंवा फोटो आपली निशाणी म्हणून ठेवतात नि पसार होतात. कधीकधी ऑफिसांमध्येही अकस्मात घुसून सारे उद्ध्वस्त करतात...ऑफिसची कागदपत्रे जाळतात...ती पूर्ण जळून जाण्यापूर्वीच हे सगळे पळून जातात. ह्या नक्षलवाद्यांजवळ सुरे, चाकू, बॉंब यापैकी काही ना काही नक्कीच असतं. म्हणून त्यांच्या वाटेला जाण्याचं साहस सहसा सामान्य लोक करीत नाहीत. सगळे कारकून बिचारे एका कोपऱ्यात अंग चोरून उभे राहतात, नक्षलवाद्यांची नासधूस उघड्या डोळ्यांनी पाहतात नि ते निघून गेले की सुटकेचा श्वास टाकतात.

अशाच एका ऑफिसवर दोन तीन वेळा नक्षलवाद्यांनी हल्ले केले. तेवढ्याने समाधान झालं नाही म्हणून की काय ते सारेजण पुन्हा एकदा येऊन धडकले. फाईलींची एक चळतच्या चळत एकाने खसकन् ओढून खाली पाडली. दुसऱ्याने क्षणभरातच आग लावली. कोणी दोन बॉंब फेकले, कोणी माओची प्रसिद्ध वाक्ये भिंताडावर, टेबलावर, जागा सापडेल तिथे लिहिली अन् पळून गेले.

ऑफिसमध्ये काम करणाऱ्या लोकांनी एका कोपऱ्यात उभं राहून निमूटपणे, असहाय्य नजरेनं सर्व काही पाहिलं. नक्षलवादी निघून गेल्यावर शांतपणे पुन्हा ते आपल्या कामाला लागले. एकाने बॉसला विचारलं,

'नक्षलवाद्यांच्या ह्या कृतीबद्दल तुम्हाला काय वाटतं ?'

बॉस हसत म्हणाले,

'हे बघा, ह्या जळणाऱ्या फाईली १९४६ च्या पूर्वीच्या आहेत. त्या मुद्दाम इथे समोरच रचून ठेवल्या होत्या. नक्षलवादी आले की त्यांना जाळायला काहीतरी लागतं ना ! आपणसुद्धा त्या जुनाट फाईली जाळणारच होतो. आपलं काम नक्षलवाद्यांनी केलं. आपला तेवढाच त्रास वाचला. कारण नव्या सगळ्या फाईली कोपऱ्यातल्या छोट्याशा खोलीत व्यवस्थित ठेवलेल्या आहेत !'

□ □ □

## □ गांधी जयंतीचा संयम

भारतीय संस्कृतीचा संयम हा आत्मा आहे...!' वाचकहो ऽऽ (ओ ऽऽ !) हे वाक्य भलतेच जड आहे. आम्ही सहसा अशी जड वाक्ये लिहीत नाही. परंतु हे मुळी –आमचे वाक्यच नाही. हे वाक्य आहे सानेगुरुजींचे. वाक्य नीट समजावे म्हणून सानेगुरुजींनी छान छान उदाहरणे दिली आहेत. आपण शंकराच्या देवळात जातो परंतु बाहेर कासवाची मूर्ती असते. कासव म्हणजे काय? कासव आपले सारे अवयव क्षणात आत घेते, क्षणात बाहेर काढते. रात्री गाणे झाले. बसलो दोन वाजे-पर्यंत ऐकत. मग झोप पुरी होत नाही. झोप झाली नाही तर पचन नीट होत नाही. (पचन नीट झाले नाही तर दुसऱ्या दिवशी होते सारखी धावाधाव.) न्यायमूर्ती रानड्यांची गोष्ट सांगतात. त्यांना कलमी आंबा आवडत असे. (तुम्हाला पण आवडतो ना? मग पुढे वाचा.) एकदा आंब्याची करंडी आली. रमाबाईंनी आंब्याच्या फोडी करून न्यायमूर्तींसमोर बशी नेऊन ठेवली. न्यायमूर्तींनी एक-दोन फोडी खाल्या. रमाबाई थोड्या वेळाने येऊन पाहतात तो बऱ्याच फोडी शिल्लक. रमाबाईंना वाईट वाटले. त्या म्हणाल्या– 'हे काय बरं?' न्यायमूर्ती म्हणाले– 'आंबा आवडतो म्हणून का आंबाच खात बसू?' खाल्ली एक फोड.' बाकीच्या फोडी मग कुणी खाल्ल्या? असा प्रश्न तुम्हाला पडेल परंतु तो महत्त्वाचा नाही. भारतीय संस्कृतीचा संयम हा आत्मा आहे हे आले की नाही लक्षात?

आपले महाराष्ट्र सरकार भारतीय संस्कृतीचे अभिमानी आहे. २ ऑक्टोबरला गांधी जयंती होती. महाराष्ट्र सरकारने लगेच हुकूम काढला–

'इंग्लीश दारू-विक्रीची सर्व दुकाने, हॉटेलातील दारू पिण्याच्या खोल्या, सरकारी ताडी विक्री केंद्रे ही सर्व या दिवशी बंद रहातील.'

आपण संक्रातीला दारू पितो, गणराज्य दिनी दारू पितो, गणेश जयंतीला दारू पितो, दासनवमीला पितो, नाथषष्ठीला पितो, गुढीपाडव्याला पितो, आंबेडकर जयंतीला पितो, शिवजयंतीला पितो, रामजन्माला पितो, हनुमान जयंतीला पितो, परशुराम जयंतीला पितो, नृसिह जयंतीला पितो, गुरु पोर्णिमेला पितो, वटसावित्रीला पितो, आषाढीला पितो, टिळक जयंतीला पितो, टिळक पुण्यतिथीला पितो, कृष्ण जन्माष्टमीला खूपच पितो, गणेशोत्सवात पितो, नानक जयंतीला पितो–गांधी पुण्यतिथीलासुद्धा पितो!

परंतु गांधी जयंतीला लोकांनी दारू पिणे केव्हाही चांगले नाही. काही संयम हवा की नाही? अरे वर्षातून एक दिवशीदेखील लोकांनी कासवाप्रमाणे आपली इंद्रिये काबूत ठेवली नाहीत, तर फादर ऑफ दी नेशनला किती बरे दुःख होईल!

आंब्याच्या करंड्या घरात असताना एक दिवशी तरी आपण न्यायमूर्तींप्रमाणे आंब्याची बशी दूर करू शकत नाही म्हणजे काय ?

सत्ताधारी काँग्रेसच्या मंदिरात शिरताना, महात्मा गांधींचे कासव दारी बांधलेले आहे याची आठवण कुणी विसरता कामा नये. गांधी जयंतीला महाराष्ट्र सरकारने तो आदेश काढला त्याबद्दल आम्ही सरकारचे अभिनंदन करतो. दोन ऑक्टोबरला बाटली भक्तांनी मग करावे तरी काय ? या दिवशी फक्त—

व्हिस्कीचे आठवावे रूप। ताडीचा आठवावा प्रताप।
देशाचे जन्मले वडील। 'आज' म्हणुनी !

## □ नासर ! नासर !!

गमाल अबदुल नासर गेले. भारत सरकारची व राज्य सरकारांची सर्व कार्यालये दफन सोहळ्याच्या दिवशी बंद होती. या पुढे दरवर्षी 'नासर पुण्यतिथी'ची सुटी मिळणार की नाही याची सर्व कर्मचारी चर्चा करीत आहेत. आम्ही म्हणतो केवळ एक दिवस सर्वांनी पलंगावर लोळून जर अरबांचे प्रेम भारताला मिळणार असेल, तर नासर पुण्यतिथीची सुटी द्यायला मुळीच हरकत नाही. नासर यांचे भारतावर कितीतरी प्रेम होते. नासर यांच्या मृत्यूनंतर त्यांची दिनचर्या वगैरेसंबंधी जो मजकूर प्रसिद्ध झाला तो म्हणूनच आम्ही काळजीपूर्वक वाचला. त्यांचा दिवस सकाळी ७ वाजता सुरू होई व रात्री १ वाजेपर्यंत ते काम करीत असत. यावरून ते लवकर पहाटे उठून भूपाळ्या वगैरे म्हणत असावेत असे दिसते. नासर हे आपल्या कुटुंबाशी जेवताना व चहा पिताना राजकारणाची मुळीच चर्चा करीत नसत. परंतु होडा या आपल्या विवाहित मुलीशी मात्र ते राजकारणावर नेहमी बोलत. होडा नासिर ही पुढे अरब प्रजासत्ताकाची अध्यक्षा झाली तर तिला भरपूर शिक्षण देऊन ठेवावे, हा विचारही भारतीयच नाही का ? दिवसातून पाच वेळा ते नमाज पढत असत यावरून धर्मावर त्यांची केवढी श्रद्धा होती हे कळते. आपली पण धर्मावर श्रद्धा खूपच आहे. नासर यांच्या वाचनात जी पुस्तके असत, त्यातली प्रमुख—१ : मार्क्स-मुनीचा कॅपिटल ग्रंथ, २ : लेनिनची पुस्तके, ३ : चर्चिल यांच्या युद्ध विषयक आठवणी, ४ : अध्यक्ष केनेडींची भाषणे, ५ : युद्धांचे लष्करी इतिहास.

नासर यांच्या अभ्यासिकेत चेअरमन माओ यांचे एक मोठे तैलचित्र असे !

हा सर्व तपशील वाचून आमची थोडीशी निराशा झाली. नासरवर महात्माजींचा परिणाम किती होता ? नेहरूंच्या पंचशीलेत ते कितीसे गुरफटले होते ? भारतातील कुठल्या व्यक्तीवर वा वास्तूवर वा वस्तूवर त्यांचे प्रेम होते ? अर्थात भारतावर त्यांचे प्रेम नसले तरी फारसे बिघडले नाही. कारण मग तर अरबांना जिंकण्यासाठी प्रतिवर्षी नासर पुण्यतिथी साजरी करणे अगत्याचेच आहे.

□ □ □

उत्तर प्रदेश

# यापेक्षा अध्यक्षीय लोकशाहीच का स्वीकारीत नाही ?

वा. दा. रानडे

उत्तर प्रदेशात चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष राजवट आली. 'लोकशाहीचा व घटनेचा खून' अशी कडक टीका उजवे कम्युनिस्ट वगळून बाकी सर्व विरोधी पक्षांनी या निर्णयावर केली आहे. त्यांची टीका केवळ विरोधी पक्षांच्या दृष्टीकोनातून केलेली आहे की घटना आणि लोकशाहीच्या दृष्टीने खरोखरच काही महत्त्वाचे मुद्दे त्यांनी उपस्थित केले आहेत ? राष्ट्राध्यक्ष राजवट अटळ आणि आवश्यक होती काय ? ती लादण्याची शिफारस करण्यापूर्वी योजावयाचे सर्व उपाय राज्यपालांनी योजले काय ? निरनिराळ्या राजकीय पक्षांचे वर्तन तरी लोकशाही व घटनात्मक संकेतांना धरून होते का ? असे प्रकार यापुढे टाळण्यासाठी सर्वमान्य संकेत कोणते ठरविता येतील ? या प्रश्नांचा विचार राष्ट्राध्यक्ष राजवटीच्या संदर्भात येथे आपणास करावयाचा आहे.

भारतीय क्रांतिदल आणि इंडिकेट काँग्रेस यांची संयुक्त आघाडी मोडण्याचे इंडिकेट काँग्रेसच्या नेत्यांनी ठरविले. तेव्हापासून पेचप्रसंगाला सुरुवात झाली. आघाडी मोडण्याचे एकदा ठरविल्यानंतर इंडिकेट काँग्रेसच्या म्हणजेच कमलापती त्रिपाठी गटाच्या मंत्र्यांनी सरळ राजिनामे देऊन बाहेर पडणे लोकशाही संकेतास धरून झाले असते पण तसे त्यांनी केले नाही. विधानसभेत चरणसिंगांचा पराभव करावयाचा असे त्यांनी ठरविले होते. चरणसिंगांनी राजिनामा दिल्यावर सर्वात मोठ्या पक्षाचा नेता म्हणून राज्यपाल आपणास मंत्रिमंडळ बनविण्यास सांगतील व आपण मंत्रिमंडळ बनवू असा त्रिपाठींचा मनसुबा होता.

त्रिपाठींचा हा डाव ओळखून चरणसिंगांनी प्रतिडाव टाकले. त्रिपाठी गटाच्या मंत्र्यांचे त्यांनी राजिनामे मागितले व त्यांनी ते न दिल्यास त्यांना बडतर्फ करण्याचा

सल्ला राज्यपालांना दिला. चरणसिंग मुख्यमंत्री असले तरी संयुक्त आघाडीत व संयुक्त मंत्रिमंडळात त्रिपाठी गट मोठा होता. आमच्या गटाने पाठिंबा काढून घेतल्यावर चरणसिगांच्या मागे बहुमत रहात नाही. तेव्हा त्यांचा राजिनामा राज्यपालांनी मागावा अशी मागणी या गटातर्फे राज्यपालांजवळ करण्यात आली. दरम्यान सिंडिकेट काँग्रेस व जनसंघाने चरणसिंगांना पाठिंबा जाहीर केला. त्याचा आधार घेऊन आपल्यामागे बहुमत असल्याचा दावा चरणसिंगांनी मांडला. त्रिपाठी गटाच्या मंत्र्यांना बडतर्फ करण्याचा सल्ला राज्यपालांनी मानला नाही पण त्यांची खाती चरणसिंगांना स्वतःकडे घेण्यास सांगितले. दरम्यान राज्यपालांनी अॅटर्नी जनरल डे यांचा सल्ला घेतला व त्या आधारे चरणसिंगांना राजिनामा देण्यास सांगितले. चरणसिंगांनी काही मुद्यांचे स्पष्टीकरण मागितले. ते न देता राज्यपालांनी राष्ट्राध्यक्ष राजवटीची शिफारस केली. राष्ट्राध्यक्षांनी त्यास मान्यता दिली. अशी ही थोडक्यात उत्तर प्रदेशातील घटनांची पार्श्वभूमी आहे.

मंत्रिमंडळातील बहुसंख्य मंत्र्यांनी पाठिंबा काढून घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी सबंध मंत्रिमंडळाचा राजिनामा सादर करून मंत्रिमंडळाची पुनर्घटना करावी हा लोकशाही संकेत आहे. चरणसिंगांनी तो पाळला नाही. मंत्र्यांची नेमणूक घटनेनुसार मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने राज्यपाल करतात. राज्यपालांची मर्जी असेपर्यंत मंत्री अधिकारावर राहतात. घटनेच्या परिभाषेत राज्यपालांची मर्जी म्हणजे 'मुख्यमंत्र्यांची मर्जी.' कारण याबाबतीत मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसारच राज्यपाल निर्णय घेतात. घटनेतील या तरतुदीनुसार मंत्र्यांचे राजिनामे मागण्याचा व त्यांनी ते न दिल्यास त्यांना बडतर्फ करावे असा सल्ला राज्यपालांना देण्याचा अधिकार आपणास आहे असा चरणसिंगांचा दावा होता.

## संयुक्त मंत्रिमंडळाचे संकेत

घटनेतील कलमाच्या काटेकोर अर्थाने चरणसिंगांचे म्हणणे बरोबर असेलही, पण एकपक्षीय मंत्रिमंडळ आणि संयुक्त मंत्रिमंडळ यांच्या कार्यपद्धतीतील फरक लक्षात घेतला पाहिजे. देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीत संयुक्त मंत्रिमंडळे अढळ ठरू पहात आहेत. तेव्हा राजकीय पक्षांच्या नेत्यांनी विचारविनिमय करून अशा मंत्रिमंडळांच्या कार्यपद्धतीबद्दल लोकशाही संकेत ठरविणे व पाळणे आवश्यक आहे. संयुक्त मंत्रिमंडळ दोन किंवा अधिक पक्षात समझोता होऊन स्थापन झालेले असते. अशा मंत्रिमंडळातील मोठ्या घटक पक्षाने पाठिंबा काढून घेणे म्हणजे त्याचा पायाच ढासळण्यासारखे असून तशा परिस्थितीत सबंध मंत्रिमंडळाने राजिनामा सादर करणे हाच लोकशाही तत्त्वांच्या दृष्टीने योग्य मार्ग होय. केवळ मोठ्या पक्षाच्या बाबतीतच नव्हे तर इतर काही घटकपक्षांनी पाठिंबा काढून घेतल्याने मंत्रिमंडळामागे बहुमत रहात नसेल तर त्यावेळीही सबंध मंत्रिमंडळाच्या राजिनाम्याचा मार्ग अनुसरणेच योग्य होईल. एखादा घटक पक्ष फुटून निघण्याने

आघाडीच्या बहुमतावर परिणाम होणार नसेल तर मात्र सबंध मंत्रिमंडळाच्या राजिनाम्याची आवश्यकता नाही.

पंजाबमध्ये अकाली दल-जनसंघ आघाडी फुटली तेव्हा मुख्यमंत्री बादल यांचा राजिनामा तेथील राज्यपालांनी मागितला नाही. मग उत्तर प्रदेशात आपल्या बाबतीतच निराळा न्याय का? असा प्रश्न चरणसिंगांनी उपस्थित केला आहे. पंजाबमध्ये बादल मंत्रिमंडळ इंडिकेट काँग्रेसच्या नेत्यांना हवे होते आणि उत्तर प्रदेशात चरणसिंगांचे सिंडिकेट काँग्रेसच्या पाठिंब्याचे नवे सरकार येऊ द्यावयाचे नव्हते म्हणून त्यांनी दोन्ही राज्यात परिस्थिती सारखी असताही एकच मार्ग दोन्हीकडे न अवलंबता आपणास सोयीचा मार्ग अनुसरला. पण आपली लोकशाही केवळ संधिसाधूंचा खेळ होऊ द्यावयाची नसेल तर तात्कालिक सोय किंवा फायद्या-पेक्षा विशिष्ट लोकशाही संकेत पाळण्याचा आग्रह धरला गेला पाहिजे.

पंजाबमध्ये त्यावेळी जो मार्ग अनुसरला गेला तो उत्तर प्रदेशातील आजच्या स्थितीत विरोधी पक्षांना सत्तेवर येण्यासाठी सोयीचा वाटतो तर इंडिकेट काँग्रेसच्या नेत्यांना नेमक्या त्याच कारणासाठी तो गैरसोयीचा वाटतो. पण राजकीय पक्षांच्या तात्कालिक सोयी-गैरसोयींपेक्षा लोकशाही संकेतांचे पालन महत्त्वाचे आहे. पंजाब-मध्ये अनुसरलेला मार्ग चुकीचा होता हे अनुभवाने सिद्ध झाले आहे. तेथे अकाली-दल व जनसंघ यांची युती १ जुलै १९७० ला फुटली तरीही आपल्यामागे बहुमत असल्याचा दावा मुख्यमंत्री बादल यांनी केला. हा दावा सिद्ध करण्यासाठी राज्य-पालांनी त्यांना विधानसभेची बैठक लौकर बोलावण्यास सांगितले. प्रथम ५ ऑगस्टला व नंतर राज्यपालांच्या सूचनेनुसार २४ जुलैला बैठक बोलावण्याचे बादल यांनी मान्य केले. चोवीस दिवसांचा अवधी मिळाला तेवढ्यात त्यांनी आपली बाजू एवढी सावरली की अविश्वास ठराव दाखल करून घेण्यास आवश्यक एवढ्या सभासदांचा सुद्धा पाठिंबा विरोधकांना मिळू शकला नाही. बादल यांच्या पक्षातून सात सभासद फुटून गुरनामसिंग गटास मिळाले होते. त्यांना त्यांनी पुन: पक्षात आणले. यासाठी उभय बाजूंची आमिषे-प्रति आमिषे दाखविली गेली असली पाहिजेत हे उघड आहे. आमिषांच्या या स्पर्धेत सत्तारूढ व्यक्तीला तिच्या स्थानामुळे अधिक यश येते. बादल मुख्यमंत्रिपदावर नसते तर त्यांना याबाबतीत एवढे यश आले असते. का? संधिसाधू आयाराम-गयारामांना उत्तेजन द्यावयाचे नसेल तर पंजाबात घडलेली चूक इतरत्र होऊ देता कामा नये. राज्यपालांनी उत्तर प्रदेशात ती होऊ दिली नाही हे योग्यच केले.

राज्यपालांच्या सूचनेनुसार चरणसिंगांनी राजिनामा दिला असता तर उत्तर-प्रदेशात एवढ्या तडकाफडकी राष्ट्राध्यक्ष राजवट आलीही नसती. सर्वात मोठ्या पक्षाचा नेता म्हणून त्रिपाठींना मंत्रिमंडळ बनविण्याची संधी राज्यपालांनी दिली असती आणि त्रिपाठींचे मंत्रिमंडळ बनण्याचा संभव दिसू लागताच भारतीय

क्रांतिदल व सिंडिकेट काँग्रेस किंवा इतर काही पक्षांचे सभासद त्रिपाठींचे पक्षास जाऊन मिळाले असते. त्रिपाठी गटाच्या दाव्याप्रमाणे हुकमी बहुमतासाठी त्यास फक्त पंधरा सभासदच कमी पडत होते व इतर पक्षातून ते फोडण्यावर त्यांची भिस्त होती. चरणसिंग व इतर विरोधी पक्षांच्या नेत्यांना वाटणारा हा धोका खरा होता. मुख्यमंत्री निवडण्याची जबाबदारी घटनेने राज्यपालांवर टाकलेली आहे. एखाद्या पक्षास निर्णायक बहुमत मिळालेले असेल तर अडचणी येत नाहीत. त्या पक्षाचा नेता हा स्वाभाविकच मुख्यमंत्री निवडला जातो. पण अशी परिस्थिती नसते तेव्हा संधिसाधू पक्षांतरांना ऊत्त मिळतो व स्थिर बहुमत कोणामागे आहे हे ठरविणे राज्यपालांना कठीण जाते. त्यांनी पक्षपाताने, केंद्राच्या दडपणाने निर्णय घेतल्याच्या तक्रारी अनेकदा झालेल्या आहेत. त्यावर उपाय म्हणजे मी मागे उत्तरप्रदेशसंबंधीच्याच लेखात सुचविल्याप्रमाणे (' माणूस ' २१ मार्च १९७०.) मुख्यमंत्र्यांची निवड करण्याचे काम राज्यपालांवर न सोपविता विधानसभेवरच सोपवावे आणि राज्यपालांकडे ते सोपवायचेच असेल तर राज्यपाल लोकनियुक्त असावा.

राष्ट्राध्यक्ष राजवटीमुळे विधानसभेची ६ ऑक्टोबरला भरावयाची बैठक स्थगित झाली. वास्तविक त्या बैठकीतच नव्या मुख्यमंत्र्याची निवड करा असे राज्यपालांनी आमदारांना सांगावयास हवे होते पण नवे पायंडे पाडण्याची आमच्या राज्यकर्त्यांची अजून तयारी नाही.

## केंद्राचे दडपण

घटनेनुसार कारभार करणे अशक्य झाल्याने राष्ट्राध्यक्ष राजवटीची शिफारस राज्यपालांनी आपल्या अहवालात केली. कोणत्याही पक्षामागे किंवा आघाडीमागे स्थिर बहुमत नाही त्यामुळे स्थिर सरकार स्थापन होण्याची शक्यता दिसत नाही असा राज्यपालांचा निष्कर्ष आहे. सभासदांच्या पक्षनिष्ठा बदलत आहेत असेही त्यांनी म्हटले आहे. राज्यपालांनी फक्त त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे केवळ निर्णय न घेता त्रिपाठी किंवा चरणसिंग यांना पर्यायी मंत्रिमंडळ बनविण्याची संधी द्यावयास हवी होती आणि विधानसभेची बैठक लौकर बोलावून त्यात या मंत्रिमंडळास बहुमताचा पाठिंबा मिळाला नसता तरच राष्ट्राध्यक्ष राजवटीची शिफारस करावयास हवी होती. तसे त्यांनी केले नाही त्यामुळे राष्ट्राध्यक्ष राजवट अटळ होती हे त्यांचे समर्थन पटत नाही. आपल्या पक्षाचे सरकार होऊ शकत नसेल तर सिंडिकेट काँग्रेसच्या आघाडीचे सरकारही होऊ द्यावयाचे नाही असे इंडिकेट काँग्रेसचे धोरण होते. ते साधण्यासाठी केंद्राच्या दडपणानेच राष्ट्राध्यक्ष राजवट लादण्यात आली. या विरोधी पक्षांच्या टीकेला समाधानकारक उत्तर केंद्र सरकार देऊ शकलेले नाही. इंडिकेट काँग्रेसचे सरकार स्थापण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण होईपर्यंत राष्ट्राध्यक्ष राजवट लांबविण्यात आली तर ही टीका अधिकच रास्त ठरेल.

राज्यपाल व राष्ट्राध्यक्ष केंद्र सरकारचे बाहुले बनले आहेत. घटनेनुसार असलेल्या अधिकारांचा ते वापर करीत नाहीत अशी टीका राष्ट्राध्यक्ष राजवटीच्या निर्णयांवर करण्यात आली. संसदीय लोकशाही पद्धती आपण स्वीकारली आहे. या पद्धतीत राज्यपाल व राष्ट्राध्यक्ष यांचे स्थान केवळ घटनात्मक प्रमुखाचे असते. त्यांनी आपले अधिकार राज्यपातळीवर मुख्यमंत्र्यांच्या व केंद्र पातळीवर पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसारच वापरावयाचे असतात. संसदीय लोकशाही मानावयाची असेल तर राज्यपाल व राष्ट्राध्यक्षांवर करण्यात येणारी टीका बरोबर नाही. राज्यपाल व राष्ट्राध्यक्ष यांना खरे सत्ताधारी बनवायचे असेल तर संसदीय लोकशाही पद्धतीचा त्याग करून सरळ अध्यक्षीय लोकशाही स्वीकारली पाहिजे पण विरोधी पक्षनेत्यांपैकी कोणीही या दृष्टिकोनातून टीका केलेली नाही.

इंडिकेट काँग्रेसचा त्रिपाठी गट, चरणसिंग आणि राज्यपाल यांच्या हातून कोणते लोकशाही संकेत पाळले गेले नाहीत याचा उल्लेख मी वर केलाच आहे. असे संकेत कटाक्षाने पाळले गेले तर सध्याच्या बऱ्याचशा कटकटी व पेचप्रसंग टाळतील. पण आजच्या सत्तेच्या राजकारणात तशी शक्यता दिसत नाही. निवडणुकीत हुकमी बहुमत मिळविणाऱ्या प्रभावी पक्षाचा अभाव, त्यामुळे अस्थिर राजवटी, त्यातून संधिसाधू पक्षांतरांना मोकाट वाव या गोष्टी कायमच्या दूर करण्यासाठी अध्यक्षीय लोकशाहीचा स्वीकार हाच खरा मार्ग आहे.

□ □ □

---

## करबुडवे

प्राप्तीकर बुडवणाऱ्या मंडळींची नावे आपले सरकार वृत्तपत्रातून प्रसिद्ध करते. त्यामागे त्यांची बदनामी करण्याचा उद्देश असतो. या बदनामीला भिऊन तरी त्यांनी करभरणा करावा अशी सरकारची अपेक्षा असते. अमेरिकेमध्ये मात्र मंडळी कर भरण्यास अतिशय उत्सुक असतात असे दिसते. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालाप्रमाणे एक कोटी दहा लक्ष करपात्र मंडळींपैकी कर चुकवल्याबद्दल केवळ पाचशे एकसष्ट मंडळींवर खटले भरण्यात आले. याचा अर्थ असा– की अमेरिकन नागरिक जगातील सगळ्यात 'प्रामाणिक'– कर दाते आहेत किंवा सगळ्यात 'बदमाष' कर बुडवे आहेत.

–एस्.

---

"परवाच्या पंचमीला संध्याकाळी पाच वाजता गावाबाहेरच्या महादेवाच्या देवळात मी गणा महाराच्या चांगुणशी लग्न करणार आहे. तेव्हा साक्षीदार म्हणून तू हजर राहशील ?"

# समाधी

**सुभाष देशपांडे**

आज कैक वर्षांनी प्रथमच मी आशाला खेडला-माझ्या आजोळी घेऊन जात होतो. गाव जसजसे जवळ येत होते तसतसे माझे मन अस्वस्थ होत होते. आशा मला पुन्हा पुन्हा काही-काही विचारीत होती. मीही तिच्या प्रश्नांना उत्तरे देत होतो. परंतु ती मला काय विचारते आहे व मी तिला काय सांगत आहे हे माझ्या काही नीट लक्षात येत नव्हतं !

गावाच्या अलीकडेच एक मोठा नाला होता. त्या नाल्यावरील पडका पूल ओलांडून आमची गाडी स्टँडच्या दिशेने जाऊ लागली. एकेकाळी नाल्याच्या एका बाजूला गाव होतं तर दुसऱ्या बाजूला महारवाडा होता. त्या जुन्या पडक्या महारवाड्याकडे नजर जाताच मी खिन्न झालो ! शून्य दृष्टीने गत इतिहासाची पाने चाळू लागलो. आशाचीही नजर तिकडे वळली, 'ही घरं कुणाची ? ती अशी पडलेली का दिसताहेत ?" तिने विचारले.

"एके काळी येथे महारवाडा होता ! पण आता मात्र महारवाडा नावाची स्वतंत्र चीजच आमच्या गावात राहिलेली नाही !"

"आश्चर्यच म्हणायचं '

"फार मोठा इतिहास आहे त्या आश्चर्यामागे !"

गाडी पुढे चालली होती पण मी मात्र भूतकालात वावरत होतो ! माझ्या डोळ्यासमोर माझी शाळा व शाळेतला दोस्त–गुंड्या उभा राहिला ! गुंड्याची हसरी मिस्कील नजर उभी राहिली आणि मी ती कधीही विसरू शकलो नाही. नावाप्रमाणेच तो गुंड आणि बंडखोर होता. लहानपणी आमच्या खेडमध्ये मी आणि त्याने जितक्या खोड्या केल्या असतील तितक्या इतर कोणी केल्या नसतील ! मला अजूनही चांगलं आठवतंय, आम्ही दोघं वेशीवरच्या मारुतीच्या देवळात जात असू आणि मधल्या सुट्टीत चिंचा, आवळे, कैऱ्या आदीच्या मोहीमेवर जे सुटायचों ते थेट शाळा सुटल्यावर आपल्या धोपट्या नेण्यासाठी परत यायचों !

गोरा पान, उंच, नाकेला, घाऱ्या डोळ्यांचा गुंड्या गोडबोले आमच्या गावाला ठाऊक होता. गावातला असा एकही शेतकरी किंवा इनामदार–जमीनदार नव्हता की ज्याच्या शेतातून आमची वारी झाली नव्हती ! तो उंच आणि सड-पातळ असल्याने झाडावर भरभरा चढायचा आणि पटापटा कैऱ्या खाली फेकायचा. मी म्हणायचों,



" आता बस बस ! "

" अगदी भरपूर झाल्या ? " तो वरूनच विचारी. तेव्हा " हों, हों, अगदी भरपूर झाल्या " मी उत्तर देई !

" मग आता ह्या कैऱ्या टाकीन त्या उचलू नकोस " असं म्हणून तो मोठमोठ्या कैऱ्या खाली टाकायचा.

" म्हणजे ? " मी न कळून विचारीत असे.

" पडू देत तशाच ! "

" का ? " मी घाबरून विचारी.

" आयला, त्या पाटलाला कळू दे तरी की तुझ्या राखणदाराच्या नाकावर टिच्चून आम्ही ही लूट नेतो !

" नकों रे, एखादेवेळी सापडलों तर तो जिवे मारील ! "

" अरे मारे ना, आज मारलं तर उद्या दुप्पट कैऱ्या काढीन ! नदीवर त्याचा पोरगा येतो त्याला सबंध दिवसभर पाण्यात डुब्या देईन ! "

गुंड्याचं धाडसच काही और होतं. कसल्यातरी आवाजानं मी घाबरून आजूबाजूला पाहिलं ! गणा वेसकराची पोरगी पलीकडच्या वावरात काटक्या गोळा करीत होती. माझा जीव भांड्यात पडला. मी झपझप पुढे निघून गेलो, पण गुंड्या मात्र तसाच तेथे रेंगाळत राहिला !

रोज सकाळी आम्ही नदीवर आंघोळीला जात असू ! रोज सकाळी ७-७॥ वाजता पंचामध्ये कपडे गुंडाळून गुंड्या आमच्या वाड्यावर यायचा आणि मोठ्याने ओरडायचा,

" अरे ए बैला, जागा झालास का ? " त्याची नित्याची हाक ऐकली की, माझा पंचा घेऊन 'आलों रेऽऽ,' म्हणून बाहेर धावत यायचो ! आमचा धांगडधिंगा बघून आई चिडायची ! म्हणायची, " कार्टी वितरली आहेत अगदी ! कशाचा म्हणून धरबंध राहिला नाही ! " ती आम्हाला रागाने फारसे कधीच बोलायची नाही, कारण आम्ही रागावण्याच्या पलीकडे गेलो आहोत असे तिचे ठाम मत झालं होतं !

त्याचे वडील नामांकित वैद्य होते. माझे वडील वकील होते. पंधरावीस माणसांनी फुललेलं घरंदाज ब्राह्मणाच्या घरातले आम्ही होतो ! परंतु आमच्यावर विषेशतः गुंड्यावर संस्कार फार काळ कधीच टिकले नाही. महार-मांगाना शिवलेलं आमच्या आजोबांना कधीच आवडत नव्हते. परंतु गुंड्याबरोबर मी नेहमीच महारवाड्यात जायचो, कारण...कारण तेथल्या झाडाच्या चिंचा गाभुळलेल्या असत. आणि दुसरं कारण म्हणजे आम्ही गावातील प्रतिष्ठित ब्राह्मणाची पोरं असल्याने आमच्या अंगावर हात टाकण्याची कोणाची शामत नव्हती ! ब्राह्मणाच्या पोरांना हात लावला तर आपल्याला पाप लागेल असे त्यांना वाटे !

आम्ही महारवाड्यातही जातो हे कळल्यावर आजोबांनी सर्व घरात गोमूत्र शिंपडले. माझ्यावर पाण्याच्या चार-सहा बादल्या आईकरवी ओतवल्या. आणि प्रायश्चित्त म्हणून मला एक दिवस उपास करायला लावला ! गुंड्याकडे जायला बंदी केली. तरीही दुसऱ्या दिवशी मी गुंड्याकडे गेलोच !"

"तुझा हा कुळबुडव्या दोस्त आला बरं कारे" असं म्हणून त्याच्या आजोबांनी दात गच्च आवळून आपली शेंडी पिरगाळली आणि मला वाटतं पीळ वाजवीपेक्षा जास्त झाला म्हणून अखेर हातातून सोडून दिली !

मी घरात गेलो ! बघतो तर गुंड्याला माजघरातल्या कोपऱ्यातल्या खांबाला बांधून ठेवलं होतं ! त्याच्या अंगावर चक्क चाबकाचे वळ होते. त्याला पाणीही पिण्यास दिलेले नव्हते असे तो म्हणाला ! पण तशाही अवस्थेत तो बेडरपणे उभा होता. म्हणाला,

"बन्या, ही घरातली माणसं महार महार करतात ना, बस, आपण ठरवलं एक दिवस या महाराच्याच पोरीला घरात नाही आणलं तर नावाचा गुंड्या नाही !"

"गुंड्या, काय बोलतोस काय ?"

"माझे दोर सोड म्हणजे सांगतो तुला सगळं." मी त्याचे दोर सोडले ! आणि आम्ही घराच्या मागच्या दिशेने बाहेर सटकू लागलो तोच गुंड्याची आई धावत आली. तिच्या डोळ्यात आसवं होती ! कापऱ्या आवाजात ती म्हणाली, "गुंड्या निघालास कुठे ? हे घे, हे खा आधी आणि मग जा." असं म्हणून तिनं गुंड्याच्या हातावर मुगदळाचे दोन लाडू ठेवले !

आम्ही नदीपाशी—नेहमीच्या कट्ट्यावर येऊन बसलो !

"बन्या, मी नक्की ठरवलं आहे, त्या वेसकराच्या पोरीशी लग्न करणार आहे मी !" गुंड्या काय बोलतो आहे तेच मला कळेना ! "म्हणजे—म्हणजे त्या दवंडी देणाऱ्या गणा महाराच्या ?" मी प्रश्न केला !

"हो हो ! त्याच्याच मुलीशी ! अरे महार झाले म्हणून काय झालं ? ती काय माणसं नाहीत ? त्यांना काही भावना नाहीत ? आपण तरी काय स्वर्गातून पडलोत ? आणि ते काय नरकातून आलेत ? घरातल्यांचे विचार मला पटत नाहीत आणि म्हणूनच मी चांगुणाशी लग्न करणार आहे !"

"पण लग्न म्हणजे...तुमची ओळख, परिचय ?"

"सगळं सगळं झालंय ! आणि म्हणूच आम्ही ठरवलंय..."

मी अवाक होऊन त्याच्याकडे बघतच राहिलो ! गणा वेसकराची चौदा पंधरा वर्षांची ती मुलगी मी अनेकदा पाहिली होती. गोरी पान आणि नाकीडोळी नीटस होती ! जात न सांगता एखाद्या घरंदाज ब्राह्मण कुटुंबात नेली असती तर कोणालाही तिच्याबद्दल संशय आला नसता ! खरोखरच फारच शांत आणि सोज्वळ दिसायची ! ह्या बंडखोर आणि चळवळ्या गुंड्याची आणि तिची गाठ कोठे पडली कुणास

ठाऊक ? मी त्यांना कोठेही आणि कधीही बोलताना सुद्धा पाहिले नव्हते, ! आणि गुंड्यानेही कधी सांगितले नव्हते ! स्वतःच्या मनातली प्रत्येक गोष्ट माझ्या-पुढे उघडी करणारा गुंड्या–छे: मला खरंच वाटेना ! !

" गुंड्या, लेका थापा मारतोस काय ?"

" आता काय सांगू तुला !"

" काही सांगू नकोस, अरे ब्राह्मणाचा पोरगा तू महाराच्या पोरीशी लग्न करणार ?"

"तेच सांगतो ! तुला आठवतं, आपल्याला हव्या तेवढ्या कैऱ्या, चिंचा काढून झाल्या की मी नेहमीच काही लूट तेथेच ठेऊन देत असे !"

" हो, ते मालकाला चिडवण्यासाठी तू मुद्दाम –"

" अरे हट, मालकाला चिडवण्याची मला काय जरूर ? लांब वावरात कोठेतरी चांगुणा बसलेली असायची !"

" अरे चोरा, तिच्यासाठी हा खटाटोप करायचास होय ?" आत्ता माझ्या डोक्यात प्रकाश पडला. " तरीच म्हटलं परवा मॅट्रिकच्या परीक्षेत तुझी दांडी कशी उडाली ! पण काय रे, तिची आणि तुझी ओळख ?" मी एकदम आठवून म्हणालो.

" दहावीत होतो तेव्हा आपण ! तू कुणाच्यातरी लग्नाला म्हणून गावाला गेला होतास ! तेव्हा मी एकटाच पोहायला जायचो ! त्यावेळी ब्राह्मणघाट सोडून मी मुद्दामच महारवाड्यातील काळ्या डोहाच्या भागात पोहायला जायचो ! फार मजा यायचा बघ ! एके दिवशी अचानक ' धावा धावा – मेले मेले " म्हणून शब्द माझ्या कानी आले. मी ताडकन मागे वळून पाहिलं, डोहामधल्या भोवऱ्याच्या दिशेने एक मुलगी वहात जाताना मला दिसली. ती भोवऱ्याच्या पट्ट्यात सापडणार एवढ्यात मोठ्या मुश्किलीने तिच्या वेणीला धरून मी तिला बाहेर काढली ! पणा वेसकराची ती मुलगी होती ! शुद्धीवर आल्यावर तिला घागरीची आठवण झाली. भोवऱ्यात गिरक्या घेत असलेल्या घागरीकडे बोट दाखवून मी म्हणालो, " ती बघ, देऊ का आणून ? हीच आमची पहिली ओळख !

" मग यापूर्वी सांगितलं नाहीस ?"

" सांगून उपयोग काय ? तू मला साथ दिली असतीस ?"

" एवढा विश्वास नव्हता वाटत –"

" आहे ! म्हणून तर आता सांगतोय !" माझ्या आजोबांना हे सगळं कळलंय ! म्हणूनच त्यांनी मला घरात डांबून ठेवलं ! महारवाड्यातल्या सगळ्या लोकांनी काल संध्याकाळी आजोबांना धमकी दिली की, तुमचा हा पोरगा पुन्हा महार-वाड्यात दिसला तर जिवंत परत नाही मिळायचा ! आजोबाही म्हणाले, " ठीक आहे, पण तुमची पोरगी गावात दिसता कामा नये ! आणि अशा पोरीशी तो संबंध जोडू पहात असेल तर तुमच्याअगोदर मीच त्याची खांडोळी करून टाकीन !"

आणि आजोबांनी मला बाहेर न पडण्याची सक्त ताकीद दिली !

"पण मी माझ्या निश्चयापासून ढळणार नाही ! तू जर साथ दिलीस तरच हे काम निर्विघ्नपणे पार पडेल ! मध्ये बोलू नकोस " म्हणून तो पुढे म्हणाला,

"परवाच्या पंचमीला संध्याकाळी पाच वाजता गावाबाहेरच्या नदीकाठच्या महादेवाच्या देवळात आम्ही एकमेकांच्या गळ्यात माळ घालून लग्न करणार आहोत ! तेव्हा आमचा साथीदार आणि साक्षीदार म्हणून तू हजर राहशील ?" असं म्हणून तो तरातरा चालायला लागला.

"अरे पण निघालास कुठे ?"

"आत्ताच काही विचारू नकोस !"

"तरी पण ?"

"तुझा पण आहेच का ! मी चाललोय चांगुणाला भेटायला."

"काय वेडा-बिडा आहेस काय ? महारवाड्यात फक्त खांद्यावर फरशा घेऊन ती माणसे तुझी वाट बघत असतील !"

"असू देत" मधल्या छोट्या सांडव्यावरून तो पलीकडे गेला सुद्धा ! त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत मी कितीतरी वेळ तेथेच खडकावर बसून होतो. सुमारे अर्ध्या तासाने तो बेडरपणे हसत हसत परत आला. मी घाबरतच विचारले,

"काय रे काय झाले ?"

"काय व्हायचंय ? चांगुणाला सांगून आलो !"

"काय ?"

"परवा पंचमीला ठीक पाच वाजता शंकराच्या देवळात यायचं –"

"आणि तिचा बाप ?"

"तो – तो बसला होता आपल्या फरशीला धार लावत !" गुंड्या हसत हसत बेफिकीरपणे बोलत होता. मी मात्र त्याचे हे धाडस पाहून पार भेदरून गेलो ! मला काही त्याचे हे लक्षण बरे दिसेना म्हणून मी म्हणालो, "गुंड्या, गुंड्या हे बरं नव्हे !"

"काय बरं नव्हे ! ब्राह्मणाने महाराच्या पोरीशी लग्न करणे बर नव्हे ? अरे, आजच्या जमान्यात त्यासारखे दुसरे मोठे पुण्य नाही !"

"मला त्याबद्दल म्हणायचे नाही ! पण या प्रकरणावरून सारा गाव पेटला आहे त्याची तुला कल्पना आहे का ? एका बाजूला सगळा महारवाडा आणि दुसऱ्या बाजूला सगळा गाव "

"अरे पेटू दे. आग पेटल्याशिवाय शांत होत नसते ! युगानुयुगे धुमसणारी ही आग केव्हाना केव्हा पेटायचीच !!

"पण त्या आगीत तू कशासाठी तेल ओततोस ? सगळ्या गावाची राख होईल त्यात !"

"होऊ दे ! एकदा हे व्हायलाच पाहिजे ! त्याशिवाय सामाजिक अन्यायाची जाणीव लोकांना व्हायची नाही"

"अरे पण त्यात तुझा वाडाही"

"जाऊ दे. वाड्याची राख झाल्यावर तेथेच मी नव्या विचारांची झोपडी बांधून चांगुणाबरोबर संसार थाटीन."

"गुंड्या, पण आता मला एक महत्त्वाची गोष्ट सांग; तुझ्या आई-बापानी तुला काही दिलं नाही तर तुझा संसार तू चालवणार तरी कशाच्या जोरावर ?"

"अरे तुला एवढं ठाऊक नाही का ? मुंबईला मामाची फॅक्टरी आहे. तो केव्हापासून मला बोलावतो आहे." असं म्हणून तो जसा आला तसा निघूनही गेला !

आणि अचानक माझ्या खांद्यावर काहीतरी धारदार वजनदार वस्तु कोणीतरी टेकवली. मी चमकून मागे पाहिले. काळा-कभिन्न आडमाप शरीराचा, राकट चेहऱ्याचा, कल्लेदार मिशेवाला गणा वेसकर कुऱ्हाड घेऊन उभा होता. त्याच्या डोळ्यातून अक्षरशः अंगार बाहेर पडत होता. त्याचे ते रूप पहाताच माझी तर पाचावर धारण बसली !

"त्यो गुंड्या कुठाय ?" त्याने भसाड्या राकट आवाजात गर्जना केली ! त्या धारदार आवाजाने माझे काळीज चिरले गेले."

"गुंड्या, गुंड्या केव्हाच घरी गेला."

"त्याला म्हन्हाव, पुन्हा म्हारवाड्यात तोंड दाखवू नकोस, नाह्यतर कोंबडीच्या मौतीनं मरशील !" असे म्हणून पाठ वळवून संथ पावलाने तो जाऊ लागला. मीही ताड्कन् उठलो आणि घराच्या दिशेने पावले टाकू लागलो, तोच गणाची हाक कानी आली ! मी त्याच्या जवळ गेलो. मला कमालीचे आश्चर्य वाटले. क्षणापूर्वी क्रोधाने पेटलेला गणा, आता ढसाढसा रडत होता. मी भीतभीत म्हणालो,

"काय रे गणा ?"

"माझ्या पोरीला मी गुरावानी बडवली. पण ती ऐकतच न्हाय-"

"मग, मग तू कशाला विरोध करतोस ? ब्राह्मणाच्या घरात तुझी पोरगी पडली तर तुला काय वाईट वाटेल ? मी काहीशा धाडसाने प्रश्न केला.

"सायेब, मला कशापायी वाइट वाटल ? आपणहून देवावानी ब्राह्मण चालत आला. मला तर खरंच वाटत न्हायी ?"

"मग तुझं काय म्हणणं आहे ?"

"माझं म्हनन ऐकतंच कोन ? या प्रकरनाचं निमित्त करून जातीभेदाचं राजकारन करन्याचा पुढाऱ्यांचा इचार हाय ! समद्यांनी फरश्यांना धार लावलीय्- प्वारगी माझी, पर ऐकतंय कोन माझं ?" म्हणून तो हमसाहमशी रडू लागला. आणि फाटक्या धडुत्याने आपले डोळे टिपीत टिपीत निघून गेला.

मी गावभर सर्वत्र कानोसा घेत होतो. गावातले वातावरण तापले होते. मारुत-राव पाटलाच्या आतल्या बैठकीत मंडळी जमली होती. पाटील तावातावाने बोलत होते, "ह्ये लगीन मोडलंच पाहिजे. अरे परत्यक्ष बामनाच्याच पोरानीच म्हार-ड्याच्या पोरीशी पाट लावला तर उद्या तुमची आमची पोरं बी त्याचा घडा गिरवल्याशिवाय ऱ्हातील व्हय ?"

"बराबर हाय, बराबर हाय," म्हणून गावकरी गरजले ! महारांचा विटाळ गावात नको म्हणून सर्वांनी कमरा कसल्या.

अखेर पंचमीचा दिवस उजाडला. मी त्या दिवशी गुंड्याकडे फिरकलो नाही— सरळ तीन वाजता शंकराच्या देवळात—गाभाऱ्यात—जाऊन बसलो—कितीतरी वेळ झाला. कोणीच येईना. हातात घड्याळ नव्हते परंतु पाच नक्की वाजले होते. एव-ढ्यात बाहेर पावलं वाजली. मी बाहेर आलो. गुंड्या अडखळत अडखळत येत होता. मी त्याच्या खांद्यावर हात ठेऊन काळजीयुक्त स्वरात म्हणालो,

"गुंड्या, अरे किती उशीर ? तीन वाजल्यापासून मी येथे बसून आहे."

तो कळवळला !

"काय झालं रे ?"

"काही नाही. चांगुणा आली का ?"

"नाही आली अजून."

"तर मग मी घेऊन येतो तिला. वेळ फार थोडा आहे तोवर तू ह्या पांढऱ्या-चाफ्याच्या माळा करून ठेव," असं म्हणून तो पाठ वळवून चालू लागला. पाठीवर त्याचा शर्ट ठिकठिकाणी फाटलेला मला दिसला ते पाहून मी त्याला हाक मारली; पण त्याने मान वळवून पाहिलेंसुद्धा नाही !

ते दोघे पंधरा-वीस मिनिटातच देवळात आलें. पण तेवढा वेळसुद्धा मला युगा-सारखा भासला. आल्यावर बाहेरील कुंडात त्यांनी हातपाय धुतले. गाभाऱ्यात आल्यावर पिंडीसमोर त्यांनी एकमेकांच्या गळ्यात माळा घातल्या. कधी आणि कसं कुणास ठाऊक पण एक साधे काळ्या मण्यांचे मंगळसूत्र त्याने चांगुणाच्या गळ्यात बांधले. मला लग्नविधीची काहीच माहिती नव्हती. म्हणून मी व्यंकटेश स्तोत्र म्हणत होतो. तोपर्यंत ते एकमेकांचे हात हातात घेऊन होते. स्तोत्र पूर्ण होत आले होते – एवढ्यात अभिषेक पात्रातील पाणी संपले म्हणून मी ते आणण्यासाठी स्तोत्र म्हणत बाहेर गेलो. बाहेर सर्वत्र अंधार पडला होता. कुंडातून पाणी घेऊन वर आलो तोच पाच-पन्नास माणसं आरडा ओरडा करीत मशाली घेऊन येत असलेली दिसली.

मी धावतच गाभाऱ्यात गेलो. चांगुणा-गुंड्याच्या कपा कुंकुम तिलक लावत होती, तोच मी ओरडलो,

"गुंड्या घात झाला. सगळा गाव इकडे येत आहे." पण माझ आ

गुंड्या जराही घाबरला नाही. चांगुणाची मात्र गाळण उडाली. तिच्या कापऱ्या हाताने गुंड्याच्या कपाळावर कुंकुम तिलकाचा फराटा उठला गेला. गुंड्या मात्र शांत होता. जय शंकर म्हणून त्याने अत्यंत धीमेपणे तिच्या भाळी मोठा तिलक लावला आणि शंकराला साष्टांग दंडवत घातला.

एवढ्यात देवळाच्या बाहेर आरडा ओरडा ऐकू आला. मी धावतच महाद्वाराशी गेलो. बाहेर पिऊन तर्र झालेले पाच-पन्नास अस्पृश्य एका हातात मशाल व दुसऱ्यात फरशा घेऊन पिसाटाप्रमाणे नंगा नाच करीत होते. मी दिसताच सर्वांनी माझ्यावर धाव घेतली. ऐनवेळी माझ्या अंगी कोणते अवसान आले कुणास ठाऊक, मी मोठ्याने गरजलो.

"महारड्यांनो, देवळात पाऊल टाकाल तर जळून भस्म व्हाल ! लक्षात ठेवा हे शंकराचं देऊळ आहे ! आम्ही बाहेर आल्यावर काय वाटेल ते करा !"

माझ्या मोठ्या आवाजाने म्हणा, देवाच्या भयाने म्हणा, किंवा माझे म्हणणे पटले म्हणून म्हणा ते गुरगुरणाऱ्या बंदिस्त व्याघ्राप्रमाणे काही पावले मागे हटले.

ती संधी साधून मी म्हणालो, "गुंड्या, एक क्षणभरही येथे थांबू नका, नाहीतर आपली धडगत नाही." माझे बोलणे पूर्ण होते न होते तोच चांगुणाचा हात धरून त्या सर्व भूतांसमक्ष गुंड्या देवळातून तीरासारखा बाहेर पडला. ते पाहून मी ओरडलो, "गुंड्या तू सांडव्यावरून पलीकडे निघून जा तोवर मी यांना थोपवतो."

डोळ्याचं पात लवते न लवते तोच गुंड्या पसार झालेला पाहताच हातात मशाली घेऊन नाचणारी ती भुतं अधिकच चवताळली.

"अरे बामना" म्हणून त्याच्यामागे पिसाटासारखी धावली. एकाने आपल्या हातातील चाकू गुंड्याच्या रोखाने फेकला. चाकू गुंड्याच्या मनगटात घुसला.


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर-प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

आता मात्र मी भयंकर पेटलो. वेळ पडली तर असावा म्हणून मी एक लोखंडी गज घेऊन आलो होतो. तसाच त्या गर्दीत घुसलो. शाखेत दंड चालवण्याचे उत्तम शिक्षण मी घेतले होते. चाकू फेकणाऱ्याचे मनगट मी एका प्रहारातच निकामी केले. समोर दिसेल त्याच्या अंगावर हातातला दंड मी चालवत होतो. त्या लोखंडी गजापुढे क्षणकाल सर्वांनी हात टेकले. तोपर्यंत चांगुणाने पदराच्या धडप्याने गुंड्याचे मनगट गच्च बांधले. ते दोघे पुन्हा धावू लागले.

ते आता सांडवा ओलांडणार तोच समोरून सर्व गावकरी त्यांच्यावर धावले.

एकाने तर चांगुणाच्या डोक्यात काठी मारली. ते पाहून गुंड्या बेभान झाला. त्याने त्यास उचलून चक्क नदीत टाकले. नदीत खूपच पाणी होते आणि सुमारे २०–२५ यार्डावरच एक मोठा भोवरा होता. परंतु तिकडे लक्ष न देता गुंड्या पुन्हा धावत धावत सांडव्याच्या पहिल्या बाजूला आला. दुर्दैवाने सर्व महारांनी ती वाट रोखून धरली होती.

पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे ती गुंड्याच्या पाठीमागे हात धुऊन लागली होती. माझा प्रतिकार केव्हाच थिटा पडू लागला होता. आपल्या हातातील जळत्या मशालीने सर्वजण गुंड्यावर तुटन पडण्याचा प्रयत्न करीत होते. गावकरी, महारवाडा व आम्ही अक्षरशः तुंबळ युद्ध चालू होते. पळून जाण्यास वाट नव्हती !

ठिकठिकाणी भाजल्याने गुंड्याची शक्ती क्षीण होत चालली होती ! आता प्रतिकार करण्यात अर्थ नव्हता. कोण कुणाला मारतोय हेच कळत नव्हतं. अखेरीस मी गुंड्याला म्हणालो, "गुंड्या, चांगुणाला घेऊन नदीत उडी टाक. आणि त्या टोकाला जा." गुंड्यानेही 'बरं आहे' म्हणून क्षणार्धात नदीत उडी टाकली. नदीच्या कडेला येण्यासाठी तो पराकाष्ठेचे प्रयत्न करीत होता. परंतु क्षीण झाल्यामुळे त्याला ते जमेना. 'भाऊजी' म्हणून आर्त स्वरातली चांगुणाची हाक मी ऐकली आणि एक कासरा घेऊन नदीत उडी टाकली !

मलाही बरंच लागलं होतं – कुठंकुठे भाजले होते. सारं अंग पाण्याच्या स्पर्शामुळे चरचरत होतं. पाण्याची भयंकर ओढ शरीराला जाणवत होती. मोठ्या प्रयत्नाने नदीच्या कडेला येऊन मी पाहिलं पण गुंड्या दिसेना ! तोच चांगुणाची पुन्हा हाक आली. मी डोळे फाडून बघत होतो. पण सर्वत्र अंधार पसरला होता. समोरच २०–२५ यार्डावरच गुंड्या आणि चांगुणा भोवऱ्यात गिरक्या घेत होती. माझ्या हातातील मशाल व कासरा मी गुंड्याकडे आधारासाठी फेकला. परंतु दुर्दैवाने फक्त मशालच चांगुणाच्या हातात पडली. त्या प्रकाशात मला दिसलं की गुंड्या अचेतन झाला आहे. ते दोघेही भोवऱ्याच्या गतीनं अधिकाधिक गिरक्या घेत आहेत – मी पुन्हा दोर फेकला. सगळे गावकरी डोळे विस्फारून हा प्रकार पहात होते. मी फेकलेला दोर चांगुणाने पकडला होता. तशाही स्थितीत मला समाधान वाटले ! शंकराचं नाव घेऊन मी जोराने दोर खेचला !

परंतु हाय दैवा–

माझ्या हातात फक्त मशालच आली–विझलेली. गुंड्या आणि चांगुणा यांनी केव्हाच भोवऱ्याच्या तळाशी समाधी घेतली होती. माझा कंठ दाटून आला. भावनोद्रेक सहन न होऊन 'गुंड्या ऽ' अशी आर्त किंकाळी फोडून मीही त्या भोवऱ्याकडे झेपावलो तोच 'जिवाचं वाईट करून घ्यायचं काय तुम्हाला बी' असं म्हणून आमचा गडी महादू याने मला धरून खसकन मागे खेचले.

सांडव्यावर अजूनही धुमचक्री चालू होती. त्या मानवी भूतांचा तो नंगानाच पाहणे नको म्हणूनच की काय पंचमीच्या चंद्रानेही ढगाआड तोंड लपविले!

पहाट झाली–मत्सराने, जातीद्वेषाने पेटलेले गाव थंड झाले!! हळहळू सर्व गाव सांडव्यावर जमू लागले. अनेकांनी नवीन गळ टाकले परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही – त्यांची कलेवरेसुद्धा कुणाला बघायला मिळेनात! सर्वांना पश्चात्ताप झालेला होता! प्रत्येकजण भोवऱ्याकडे बघत डोळ्यातून टिपं गाळत होता.

गुंड्याचे आजोबा स्वतःच्या तोंडात मारून घेऊन म्हणू लागले, "मी माझ्या गुंड्याला केवळ एका मुलीशी विवाह करण्याच्या क्षुद्र कारणावरून गाढवासारखं घरातल्या खांबला बांधून, चामडी लोळवेतर मारलं. संत महंतांनी दिलेली जातीभेदाबाबतची शिकवण मी विसरलो. मी नालायक आहे–नीच आहे–चांडाळ आहे! मला देव नरकातसुद्धा जागा देणार नाही!" असं म्हणून पुन्हा पुन्हा स्वतःला मारून घेऊ लागले! ते पाहून महारांना वाईट वाटू लागले! आपल्या हातून घडलेल्या नीच कृत्यामुळे दोन निष्पाप जिवांचा बळी गेला या जाणीवेने त्यांच्या हृदयाचं पाणी पाणी झालं!!

एक दिवस गेला–दुसरा गेला तरीही तपास लागेना! अखेर तिसऱ्या दिवशी पाण्याने तट्ट फुगलेली त्यांची कलेवरे डोहाच्या उदरातून बाहेर आली!

तशाही अवस्थेत त्यांनी एकमेकाला मारलेली मिठी सुटली नव्हती!

ते पाहून सर्व गावकरी फार हळहळले. त्या प्रेमी युगुलाची स्मृती म्हणून सर्वांनी तेथेच एक छोटीशी समाधी बांधली. आणि शपथ घेतली की आता यापुढे जातीभेद मानायचा नाही–मानायचा नाही–बस्. तेव्हापासून महारवाडा नावाची स्वतंत्र वस्ती आमच्या गावात राहिली नाही?

अचानकपणे मला जोराचा धक्का बसला! मी पूर्वस्मृतीतून जागा होत आजूबाजूला पाहिले–गाडी स्टँडवर येऊन उभी राहिली होती–आमचा महादू साहेब, साहेब म्हणून हाका मारीत होता–मी त्याच्याकडे सामान दिले. तो चालू लागला–तरीही मी तेथेच उभा होतो.

" साहेब, चलायचं ना ?" महादूची हाक आली. " अं, हो ! तू पुढे चल मी आणि बाई समाधीचं दर्शन घेऊन येतो !"

" कुठली समाधी ? कुणाची समाधी ? कोणा साधू संताची आहे काय ?" आशा अनेक प्रकारचे प्रश्न विचारीत होती. तिच्याकडे माझे लक्ष नव्हते ! आम्ही पुढे चाललो होतो !!

ते शंकराचे देऊळ नजरेच्या टप्प्यात येताच तेथील पांढऱ्या चाफ्याच्या झाडावरून ओंजळभर फुले मी खुडून घेतली. ते मंदिर ओलांडून जात असता त्या चिरेबंदी कोरीव मंदिराकडे पहात आशा हर्षाने म्हणाली, " अय्या किती किती सुंदर देऊळ आहे. जाऊ या ना !"


" नको " मी तुटकपणे म्हणालो.

" का ?" तिने आश्चर्याने प्रश्न केला.

" त्या मंदिरात देव नाही." माझ्या मुखातून वेदनापूर्ण उद्‌गार निघाले. ती विस्फारित नेत्राने माझ्याकडे बघत राहिली ! म्हणाली, " मग ही फुले ?"

" एका थोर पुरुषाच्या समाधीसाठी !!" माझी नजर क्षितिजावर खिळली होती. सूर्यबिंब ढगात बुडू पहात होते. तेथूनच नदी वहात येत होती. सांडव्याखालून पुढे वहात जाऊन भोवरा असलेल्या त्या काळ्या डोहात मिसळून गिरक्या घेत पुढे निघून जात होती !

सांडव्याजवळच्या समाधीजवळ मी गेलो. एक म्हातारा गृहस्थ समाधीला फुले वाहून निघून जाताना मला दिसला ! क्षणभर मला वाटले, हा गणा महार तर नव्हे ! पण मी तिकडे वळून पाहिले नाही ! नतमस्तक होऊन, साश्रु नयनाने मी माझी ओंजळ तेथे रिकामी केली !!





# रोखलेल्या बंदुका उठलेली जनता

**अनिल बर्वे** — **लेखांक : आठ**

आंध्रचा शेकडो चौरस मैलांचा प्रदेश हिंडून मी तेथील दारिद्र्य पाहिले. ते दारिद्र्य हिंदुस्थानात सर्वत्रच पहायला मिळते. उद्योगधंद्यातली मक्तेदारी, वाढती महागाई, प्रचंड बेकारी, आर्थिक विषमता ही सर्वसामान्य माणसाला समजते. ती समजावून सांगायला अर्थतज्ज्ञांची व राजकीय भाष्यकारांची जरुरी

नाही. पण म्हणून केवळ आर्थिक विषमतेतून, दरिद्री जीवनातून या देशात क्रांती होईल काय ? अर्थातच नाही. जनतेच्या क्रांतीसाठी देशातील राजकीय-आर्थिक बदलाबरोबरच क्रांतिकारक वर्गातील बदल आवश्यक आहेत. जोपर्यंत सामुदायिक उठाव करण्याएवढी ताकद व नेतृत्व सर्वहारा वर्गाजवळ नाही तोपर्यंत प्रस्थापित सरकार नष्ट होणार नाही. ही कुवत व नेतृत्व जनता चळवळीतर्फे, वेळप्रसंगी संसदीय लोकशाहीचा उपयोग करून क्रांतिकारी वर्गामध्ये तयार करणे हे क्रांतिकारी पक्षाचे प्रमुख काम. भारतातील दोन्ही कम्युनिस्ट पक्षांनी या कार्याकडे दुर्लक्ष केले. तेलंगणातील पराभवाने साम्यवादी नेत्यांमध्ये पराभूत मनोवृत्तीचे नेतृत्व निर्माण झाले. आर्थिक प्रश्नावर कामगारांच्या संघटना विनासायास उभारता येऊ लागल्या. घटनेच्या गुलामगिरीखाली काही काळ सत्ता उपभोगायला मिळाली. या दिखाऊ संसदीय प्रतिष्ठेला भुललेले कम्युनिस्ट नेते जनतेच्या क्रांतिकारी चळवळीकडे मात्र दुर्लक्ष करू लागले. सत्तेच्या हव्यासामुळे कम्युनिस्ट नेते स्वतःच्या लीडरशीपला जपू लागले. तरुण अनुयायांना दडपू लागले. निवडणुका होत गेल्या. बार्गेनींग पॉवरचे राजकारण खेळून खूर्च्या टिकवल्या गेल्या. जनतेच्या परिस्थितीत काहीच बदल झाला नाही. ज्या काही थोड्या फार संघटना उभारल्या गेल्या त्या आर्थिक समस्यांवरच उभारल्याने, राजकीय जागृती नसलेल्या ठरल्या, आणि प्रतिगामी शक्तीच्या प्रखर हल्ल्यांपुढे धडाधड कोसळू लागल्या. यातूनच प्रखरवृत्तीचे अनुयायी पक्षाबाहेर फेकले जाऊ लागले. काही फ्रस्ट्रेट होऊन आणि काही एक्स्ट्रीमीस्ट होऊन. नक्षलवादी क्रांतीचे मूळ या एक्स्ट्रीमीस्ट मनोवृत्तीमध्येच आहे.

कम्युनिस्ट पक्षाबाहेर पडलेल्या अतिरेक्यांना चारु मुजुमदार सारख्या विचारवंतांनी तात्विक बैठक व कार्याची दिशा ठरवून दिली. यातूनच पुढे कम्युनिस्ट क्रांतिकारकांचे विविध गट निर्माण झाले. या सर्व प्रक्रिया गोंधळाच्या व अस्थिर वातावरणात झाल्याने त्यात सूत्र राहिले नाही. म्हणूनच क्रांतिकारकांच्या ताकदीपेक्षा काम कमी परिणामकारक ठरले. दोन्ही कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाने या क्रांतिकारकांशी उभा दावा मांडला. त्यांना चळवळीतून अलग पाडण्याचा प्रयत्न केला. जनमानसात त्यांच्याविषयी विकृत प्रतिमा निर्माण केली गेली. विविध राज्यातल्या क्रांतिकारकांचे एकमेकांशी संबंध नसल्याने अखिल भारतीय पातळीवर ते लवकर संघटित होऊ शकले नाहीत. अजूनही झालेले नाहीत. आजसुद्धा देशात विविध ठिकाणी शेकडो छोटे छोटे गट क्रांतिकारकांच्या पक्षाशी संलग्न झालेले नाहीत.

अशा निराशाजनक अवस्थेतही हा जो छोटा क्रांतिकारी पक्ष स्थापला गेला तो लढाऊ व प्रखर कसा राहिला ? नेत्यांच्या अटकेनंतरही चळवळ थंड का पडली नाही ? कारण या पक्षाची जडण घडण खऱ्या क्रांतिकारी पक्षासारखी आहे. प्रथम नेते नंतर अनुयायी अशी 'आधी कळस मग पाया' या तत्त्वावर या पक्षाची

उभारणी झाली नाही. प्रथम विविध ठिकाणचे अनुयायी व गट संघटित होऊन, 'ऑल इंडिया को ऑर्डिनेशन कमिटी 'ला सामील होऊन, नंतर सामूहिक नेतृत्व तयार झाले. यामुळेच पक्षातील सर्वात लहान कार्यकर्ता हा सुद्धा चळवळीला जबाबदार बनला. लढणारा प्रत्येक कार्यकर्ता हा राजकीय दृष्ट्या जागृत राहिला. या छोट्या पक्षाची मुळे म्हणूनच जास्त भक्कमपणे रुजली गेली.

क्रांती ही समाजातील कोणताही विशिष्ट एक घटक करत नाही तर समाजातील क्रांतिकारी प्रवृत्ती घडवते. भारतात जसजशी डावी राजकीय ताकद वाढत जाईल तसतशी इथली क्रांतिकारक चळवळ वाढत जाईल. नक्षलवादी हे जसजसे जास्त प्रखर होतील तसतसे इथले डावे पक्ष त्यांच्यामागे फरफटत जातील. जनआंदोलन जसे प्रखर बनत जाईल तसे इथल्या राज्यकर्त्यांचे वर्गीय स्वरूप आणि धोरण उघडे पडत जाईल. संसदीय लोकशाही व घटना या केवळ शोषक वर्गाच्या रक्षणाकरता बनवल्या आहेत. या राज्ययंत्रणेवरील पक्कड शोषक–सत्ताधारी वर्गाच्या हातून निसटू लागली तर ते सरळ या तथाकथित लोकशाहीला पायदळी तुडवतील.

समाजात जसजसे राजकीय, आर्थिक बदल घडतात त्या प्रमाणात समाजातील क्रांतिकारक प्रवृत्तींचे बिंदू सरकले जातात. वीस वर्षांपूर्वी संस्थानी प्रदेशातील जनतेमध्ये या क्रांतीचा बिंदू होता व तो बी. टी. रणदिव्यांनी ओळखला. तेलंगणचा उठाव दडपला गेला. लीऊ शाओ ची सारख्यांनी या उठावाला डावा साहसवाद अशा लाखोल्या वाहिल्या. आज हा क्रांतिकारक संघर्षबिंदू आदिवासी गिरिजनांमध्ये सरकला आहे. चारु मुजुमदारासारख्या विचारवंतांनी तो ओळखला आहे. डावे पक्ष मात्र साहसवादी, कित्येकदा देशद्रोही अशा सवंग शिव्या त्यांना देत आहेत.

शेतकरी, कामगार व मध्यमवर्ग यांची संयुक्त आघाडी बनवून खेडी जिंकून शहरांना वेढण्याचे स्वप्न पूर्ण व्हायचे असेल तर आदिवासी शेतकऱ्यांप्रमाणेच कामगारांमध्येही नक्षलवाद्यांनी कार्य करणे आवश्यक आहे. परंतु निदान आज आंध्रमध्ये तरी कामगारांमध्ये नक्षलवादी कार्यकर्ते नाहीत. भारतातील मध्यमवर्ग हा प्रथमपासूनच त्याला मिळालेल्या ऐतिहासिक परंपरेने भांडवलदार वर्गाचा हस्तक व संरक्षक म्हणून काम करीत आला आहे. याला अपवाद केवळ शहरातून पसरलेला विद्यार्थीवर्ग. भारतातील विद्यार्थी हा भारतीय क्रांतीतला महत्त्वपूर्ण घटक आहे.

भारतातच काय परंतु साऱ्या जगात या पुढे प्रत्येक सामाजिक बदलात विद्यार्थीवर्गाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. चीनमधील सांस्कृतिक क्रांती विद्यार्थ्यांनी घडवली. फ्रान्समध्ये विद्यार्थ्यांनी मोठे उठाव घडवले. ग्रीसमध्ये विद्यार्थ्यांनीच सरकारविरुद्ध दंड थोपटले. सहासष्टमध्ये पूर्व भारतात विद्यार्थ्यांनी दंगली केल्या. त्या दंगलीची मुळे समाजिक विषमतेत व अन्यायात होती. परंतु डाव्या पक्षांनी विद्यार्थी चळवळीकडे दुर्लक्ष केल्याने विद्यार्थ्यातली लढाऊ प्रवृत्ती, संघटन यांचे क्रांतीमध्ये पर्यवसान न होता दंगलीत झाले. परंतु चारु मुजुमदारसारख्या विचारवंतांनी

विद्यार्थ्यांचे क्रांतिकारक स्वरूप ओळखले. पक्षात, संघटनेत त्यांचे स्थान प्रमुख ठेवले. म्हणूनच बंगालमध्ये कनु संन्यालला पकडताच विद्यार्थ्यांनी उठाव केले. भारतात मध्यमवर्गाच्यावतीने विद्यार्थीच क्रांतीत भाग घेणार आहेत.

भारतातील जनतेचे प्रश्न नक्षलवाद्यांनी समजावून घेतले. जनता चळवळी उभारल्या. आणि भारतातील डाव्या पक्षांना क्रांतिमार्गाकडे वळावयास भाग पाडले. भूमी मुक्ती आंदोलनासारख्या बोगस परंतु मूलभूत प्रश्नांना हात घालणाऱ्या चळवळी डाव्या पक्षांना म्हणूनच कराव्या लागत आहेत.

भारतीय क्रांती ही जागतिक साम्राज्यवाद व वर्गीय समाजावरील सर्वात शेवटला प्राणांतिक घाव ठरणार आहे. तेव्हा भारतातील क्रांतिकारक उठाव दडपण्याकरता परकीय साम्राज्यवादी व त्यांचे हस्तक अतिशय मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करतील हे उघड आहे. म्हणूनच भारतीय क्रांती ही साम्राज्यवाद, नोकरशाही, भांडवलशाही आणि सरंजामशाही याविरुद्ध राहणार आहे. चारु मुजुमदारसारख्या विचारवंतांनी हे निदान केले आहे व त्यांची व्यूहरचनाही त्याप्रमाणावर आखली आहे.


क्रांती ही घटना नव्हे, तर एक प्रक्रिया आहे—प्रवाह आहे. विविध वर्गीय संस्कारांनी बुरसटलेली मने कळत न कळत या प्रवाहात विकृती निर्माण करतील. कदाचित चुकीच्या वाटेने जातील. तेव्हा सदैव जागृत नेतृत्व ही भारतीय क्रांतीची गरज आहे.

हा देश खंडप्राय, विविध ठिकाणचे प्रश्न विविध. तेव्हा एकच ठोकळेबाज सूत्राने किंवा सिद्धांताने इथले प्रश्न सुटणार नाहीत. त्यामुळेच विविध क्रांतिकारी गटांचे अस्तित्व हे अपरिहार्य आहे.

भारतामध्ये होणारी क्रांती पूर्णपणे नव्या मूल्यांवर असेल. तिला जुनी परंपरा नाही. तेव्हा ती बऱ्याचदा अडखळेल, ठेचाळेल, सुरुवातीस पराभूतही होईल. परंतु क्रांती अटळ आहे. या क्रांतियज्ञात या देशाचा उज्वल भविष्यकाळ आहे. न जाणो कित्येक जणांना इतिहासात नमूदसुद्धा न होणारे हौतात्म्य, अवेहलना स्वीकारावी लागणार आहे. आज हजारो क्रांतिकारक कारावासात पडले आहेत. शेकडो मेले आहेत. त्यांना गुंड—मवाली ठरवण्यात येत आहे. त्यांची नावेसुद्धा आम्हाला माहीत नाहीत. हे सर्व रक्तकंदन पाहिल्यावर माझ्या भेकड आणि पलायनवादी मनालासुद्धा चीड येते—मन आक्रोश करते.

# समाप्त

१४ ऑक्टोबर १९७०



# प्रतिज्ञा

## सामान्य कथासंग्रह

**सौ. पुष्पा भावे**

एक लघुकथा ही स्वतंत्र निर्मिती असली तरी एकाच वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वातून निर्माण झालेल्या कथांमधून एक समान सूत्र निर्माण होते. एखाद्या नव्या कथाकाराचा संग्रह वाचत असताना 'त्याची' लघुकथा निर्माण होते आहे काय, याचाही शोध वाचक घेत असतो. लघुकथा हा वाङ्मयप्रकार ज्या वैपुल्याने निर्माण होतो त्याकडे पाहता असे वेगळे व्यक्तिमत्त्व असणारी कथा लिहिणे किती अवघड परंतु आवश्यक आहे, हेही ध्यानात येते.

श्री. पंडित क्षीरसागरांच्या 'प्रतिज्ञा' या कथासंग्रहाचा चटकन जाणवणारा विशेष म्हणजे त्यातील चौदा कथांपैकी सहासात कथांमध्ये उपवधू मुलांची मनःस्थिती हा मूलाधार आहे. किंबहुना पाहायला गेल्यावर मुलगी आवडून, हुंड्याचा विचार न सुचता, चटकन होकार देणे आणि नंतर तिचे रूप मनात वागवणे याचे वर्णन पुस्तकात पुन्हा पुन्हा येते. मराठी मासिके वाचणाऱ्या विशाल वाचकवर्गाच्या स्वप्नरंजनाच्या गरजेचा सामान्य मराठी कथाकारांवर झालेला हा परिणाम असावा.

पण केवळ कथांची कथानके, जुनी, सांकेतिक आहेत एवढाच आरोप या कथासंग्रहावर करता येणार नाही. त्याशिवाय, वेगळेपणा आणण्यासाठी श्री. क्षीरसागरांनी, या जुन्या कथानकांना अगदी भडक, अतिशयोक्त स्वरूपे दिली आहेत. यामुळे कथानकांची रचना साहजिकच कृत्रिम झाली आहे. कथानकातील छोट्या प्रसंगाची स्पष्टीकरणात्मक रचना करायची, आणि कथा सुरू होते त्याच्याविरुद्ध बिंदूशी संपवायची, अशी श्री. क्षीरसागरांची कथाशैली आहे. 'अनामिक', 'मधुचंद्र', 'संकटसुंदरीला मदत' या तीनही कथांची बीजे वस्तुतः विनोदी कथांची आहेत; परंतु गंभीर कथांच्या धर्तीने लिहिल्यामुळे त्या काहीशा हास्यास्पद झाल्या आहेत.

प्रस्तुत कथासंग्रहात 'खून आणि आत्महत्या' व 'शिक्षा' या दोनच वेगळ्या कथा आहेत. 'शिक्षा' या कथेतील मातृप्रेमी अर्धसमजत्या मुलाचा पितृद्वेष मुळात लक्षणीय असला तरी कथेत तो वर्णनात्मक रीतीने आल्यामुळे प्रभावी होत नाही. शिवाय त्या कथेचा शेवटही तिच्या कथासूत्राशी विजोड झाला आहे. नवकथेच्या काहीशा अॅब्सर्ड मनःसूत्रावर अवलंबून असलेल्या शैलीच्या संस्कारातून 'खून आणि आत्महत्या' ही कथा निर्माण झाली आहे. परंतु अनुकरणाखेरीज फारसे काही

याही कथेत जाणवत नाही. 'मोह' आणि रात्रीची गोष्ट' या कथांतून लेखकाने केलेला मनोविश्लेषणाचा प्रयत्न फारच दुर्बळ आहे.

१९७० साली प्रसिद्ध झालेल्या अशा व्यक्तित्वविहीन कथासंग्रहांकडे पाहिले की लघुकथा या वाङ्मयप्रकाराची लोकप्रियता किती विघातक आहे, हे लक्षात येते. वस्तुत: मराठी लघुकथा अनुभव आणि आविष्कार या दोन्ही अंगांनी समृद्ध आहे; असे असताही आज नवकथेच्या उत्कर्षाच्या कालखंडाला जवळजवळ दीड तप होत आल्यानंतरही अशा, केवळ गोष्टी सांगून विषयातील स्वप्नरंजनी आकर्षणावर भर देणाऱ्या कथा पाहिल्या की सामान्य मराठी वाचकाच्या अभिरुचीच्या कूर्मगतीचा प्रत्यय येऊन मन विषण्ण होते !

---

वाचनीय

## मुऱ्हाळी

---

श्री. काकडे यांचा कथासंग्रह प्रादेशिक वातावरणाच्या कक्षेतील असूनही साचेबंद ग्रामीण कथेसारखा निर्जीव झालेला नाही. कारण त्यांना स्वत:ची स्वतंत्र कथाशैली लाभलेली दिसते.

आज प्रादेशिक कथा वैपुल्याने निर्माण होत असल्याने, वेगळेपणामुळे निर्माण झालेले तिच्यातील आकर्षण संपुष्टात आले आहे. बरेच प्रादेशिक लेखन करणारे लेखक ठरीव लकबींवर आधारलेल्या कथा लिहीत असल्याने प्रादेशिकतेतील ताजेपणा नाहीसा झाला आहे. अशा वेळी 'मुऱ्हाळी'सारखा संग्रह आश्वासक वाटतो.

तसे पाहिले तर श्री. काकडे यांच्याही कथांतील जीवनानुभव ग्रामीण कथेच्या ठरीव वर्तुळाबाहेर जाणारे नाहीत. परंतु कथा घडवताना केवळ आपल्या पात्रांच्या दारिद्र्याच्या दर्शनाने वाचकांची सहानुभूती मिळवण्याचे अथवा रांगड्या शृंगारनिर्मितीने त्यांना आकर्षित करण्याचे यत्न लेखकाने केलेले नाहीत.

'मुऱ्हाळी' आणि 'सासुरवाशीण' या प्रस्तुत संग्रहातील दोन अत्यंत हृद्य कथा आहेत. प्रादेशिक कथेमध्ये प्रादेशिकता हा मूल अनुभव नसून कोणत्याही इतर कथेप्रमाणे भावनांचे स्पंदन हाच तिचा केंद्रबिंदू असला पाहिजे, हे या नव्या कथाकाराने जाणले आहे. म्हणूनच 'माग'सारखी उथळ गुन्हेगारी कथा या कथाकाराने का लिहावी उमगत नाही. प्रस्थापित गुन्हेगारीविषयी लेखकाची सहानुभूती व्यक्त करण्यापलीकडे त्या कथेतून काही साध्य होत नाही.

या कथा वाचत असताना काही अभावात्मक गुण जाणवतात. उदा० 'वायलं',

'सुटका' यासारख्या कथात, मराठी कथातील नेहमीचे भावविवश संवाद टाकलेले दिसतात.

प्रादेशिक कथांमधून आज बोली भाषा अधिकाधिक योजली जाऊ लागली आहे. श्री. काकडे यांची बोली भाषेश अनुसरणारी शैली अत्यंत सहज वाटते. 'फिराडू होणे', 'पडाळं', 'निसूर होणे' यासारखे त्या बोलीतील शब्द, 'डायरेक'सारखे बोलीत रुळलेले इंग्रजी शब्द, यामुळे उचित वातावरण निर्माण होते. कथानिवेदनामध्ये शरीरवर्णन, निसर्गवर्णन यांना लेखकाने फारसे महत्त्व दिलेले आढळत नाही. काही कथात (उदा० 'प्रारंभ', 'कटिंग') मात्र माणसाच्या अंतर्मनातील प्रक्रिया नाजुकपणे व्यक्त केल्या आहेत. काही कथात विनोदाच्या नर्म छटाही आढळतात.

'मुऱ्हाळी' या श्री. द. स. काकडे यांच्या कथासंग्रहात आज तर वाचनीयता निर्माण झाली आहेच; परंतु हा कथासंग्रह वाचत असताना त्यांच्या पुढील कथालेखनाविषयी ग्रामीण अथवा प्रादेशिक संदर्भनिरपेक्ष 'कथा' म्हणून अपेक्षाही निर्माण झाल्या आहेत.

प्रतिज्ञा : पंडित क्षीरसागर : सुरेश कृ. कुलकर्णी, पुणे : मूल्य सात रुपये.

मुऱ्हाळी : द. स. काकडे : अभिनव प्रकाशन, मुंबई : मूल्य चार रुपये.

## शब्दप्रभूंचे अर्थकारण

'द ऑथर' नावाचे लेखक आणि लेखनविषयक चटकदार माहिती देणारे एक इंग्रजी मासिक आहे. त्यातील एका अलीकडच्या अंकात एका चिडलेल्या वाचकाचे पत्र प्रसिद्ध झाले होते. त्यात तो म्हणतो : "'द ऑथर,'चा मागील अंक पाहिला. त्यात इथून तिथून साऱ्या लेखकांनी पैशाबद्दल केलेल्या तक्रारी. कुतूहलाने मी असे संदर्भ मोजले. अवघ्या दहा पानात एकावन्न संदर्भ मिळाले.

हे पत्र 'बुक्स अँड बुकमेन' या मासिकाच्या 'बुकमार्क्स' या सदरात उद्धृत केले असून त्यावर पुढील मल्लिनाथी केली आहे : 'सदर पत्रलेखकाला साहित्यिकांच्या विश्वाची फारशी ओळख दिसत नाही. नाहीतर त्याला हे कळले असते की दोन किंवा अधिक साहित्यिक एकत्र जमले म्हणजे मानधन, चित्रपटांचे हक्क, स्वस्त आवृत्त्या, मिळकत–कर यांच्याबद्दलच बोलणे चालते त्यांचे. डी. एच्. लॉरेन्सच्या पत्रातून मानधनाबद्दल केलेल्या तक्रारी कितीतरी पाहायला मिळतात. 'लेडी चॅटर्लिज लव्हर' ही त्याची कादंबरी काही प्रकाशकांनी चोरून प्रसिद्ध केली आणि त्यांच्याकडून मानधन वसूल करताना किती ताप झाला, हे तो पत्रात लिहितो. फिट्झेराल्डने प्रकाशकांजवळ लावलेला तगादा त्याच्या पत्रांतून आढळतो.

पुढच्या पिढ्यातील वाचकवर्ग डोळ्यासमोर ठेऊन आपले साजिरे स्वरूप व्यक्त होईल अशा रीतीने आपली पत्रे सजवण्याचे पूर्वीचे दिवस केव्हाच संपले. आता पत्र लिहायचे तर पैशासाठीच–नाहीतर लिहायचेच कशाला ?' □




अॅडव्होकेट
माधव
कानिटकर

लेखांक
पाच

५ जुलै १९५७ ! न्यायमूर्ती बेदी यांच्या कोर्टात मुंगी शिरायला जागा नव्हती. आज वकिलांची भाषणं व्हायची होती. आरोपी जेव्हा बचावाचे साक्षीदार तपासतात तेव्हा प्रथम भाषण करण्याचा मान आरोपींच्या वकिलांचा असतो. आरोपींचे वकील उभे राहिले. आज त्यांना त्यांचं वक्तृत्व आणि बुद्धिमत्ता पणाला लावायची होती. त्यांनी बचावाच्या भाषणाला सुरुवात केली, 'प्लीज युवर ऑनर! कोर्टापुढे आलेला प्रत्येक खटला महत्त्वाचा असतोच, पण हा खटला अत्यंत महत्त्वाचा आहे. या खटल्याशी राजकारणाचा काही संबंध नाही. पण एक गोष्ट नक्की की आपल्या देशात लोकशाही टिकून आहे ती कोर्टं आहेत म्हणून. एरव्ही पोलीस कसे आहेत ते वेगळं सांगायला नको! सामान्य माणसाच्या दृष्टिकोनातूनच याचा विचार व्हायला हवा. कुणालाही

विचारा. हे सर्व लोक अचानक श्रीमंत कसे बनले? गरीब झाली फक्त पंजाबची जनता! हा बघा 'दि ट्रिब्यून'चा अंक, हा बघा 'दि डेली मिलाप' काय वाभाडे काढल्येत पोलिसांचे? पंजाब पोलिसांनी ही केस प्रेस्टीजची केस बनवली. या नामदार कोर्टापुढे कुणाला खेचले नसते तर पंजाब पोलिसांची अब्रू गेली असती. मग काय करणार? आणा कुणालाही! त्यांचं काय जातंय?

पोलीस स्वतः कबूल करतात की २०० दाखलेबाज आम्ही 'संशयित' म्हणून आणले होते. २०० माणसांवर संशय! काय गंमत आहे? त्या मुलाच्या तोंडावर देवीचे वण आहेत. पण डॉ. बालकृष्ण, लाल मशी, १५ कॉन्स्टेबल्स, मोतासिंग, बस ड्रायव्हर यापैकी एकजण पोलीसऑफीसरला असं बोलत नाही की 'त्या आठ जणात एकजण देवीचे वण असलेला होता ऽऽऽ!' आता तो ग्यानसिंग काय बोलला ते बघू. प्रथम प्रश्न पडतो की ग्यानसिंगालाच माफीचा साक्षीदार का बनवला? जगजितसिंग, मुला आणि रूरा यांना त्यांचे जीव प्यारे नाहीत? त्यांना पोलिसांनी माफीचा साक्षीदार होण्याबद्दल विचारलंदेखील नाही? ग्यानसिंग म्हणतो, 'मला फाशी होईल या भीतीने पोलिसांनी सांगितलं तसं मी बोललो!' काय हे? पंच आले! युवर ऑनर! असा आलाय तुमच्यापुढं कुठला खटला की ओळख परेड-मध्ये सगळेच्या सगळे विटनेसिस आरोपींना ओळखतात? या खटल्यात ओळख-णारच, कारण केस पोलिसांची ना! पोलिसांनी साक्षीदारांना आरोपी दाखवून ठेवले असले पाहिजेत. हत्यारं? सगळी मिळाली! कुठल्या पोलिसांना लुटीचा सगळा माल परत मिळतो? यांना मिळाला! कारण पुरावाच खोटा! फिंगर प्रिंट एक्सपर्ट? आधी माझ्या अशिलांचे अंगठे उमटवले आणि मग फोटो घेतले! उगाच बोलत नाही. २ महिने माझे अशील पोलीस कस्टडीत होते. १६० साक्षीदार होते तर ग्यानसिंगला माफीचा साक्षीदार बनवायची जरूरच काय होती? युवर ऑनर! मी एकंदर २९ साक्षीदार तपासले. त्यातल्या १० जणांनी सांगितलं की, रूरा आणि ग्यानसिंग तुरुंगात होते, पण त्यांना कधी बँकेच्या दरोड्याबाबत बोलताना आम्ही ऐकलं नाही! तर १९ साक्षीदार असं बोलले की, तारीख १ एप्रिल १९५७ ला रात्री जगजितसिंगकडे पार्टी होती आणि आम्ही हजर होतो. जगजितसिंग बाहेर कुठे गेलाच नव्हता. युवर ऑनर! आम्ही गुन्ह्याच्या ठिकाणी नव्हतोच. (Alibi) हा बचाव फार डेंजरस असतो हे मला ठाऊक आहे. पण तितकाच तो फायद्याचाही असतो! कारण सगळ्या आरोपींपैकी एक जण जरी असं सिद्ध करू शकला की गुन्ह्याच्या ठिकाणी मी हजर नव्हतोच तर बाकीच्यांनाही संशयाचा फायदा मिळतो. कारण सरकारपक्षाचे साक्षीदार तद्दन खोटं बोलतात की, 'हे सगळे होते!' आता? एक नव्हे, दोन नव्हे १९ माणसं असं सांगून गेलीत की, 'जगजितसिंग त्या दिवशी रात्री घरीच होता!'


...वकीलसाहेबांनी त्यांचा आवाज आता खाली आणला. त्यांचा गळा दाटून आला! ते पुढे बोलू लागले,

'हेड कॉन्स्टेबल निर्भयसिंग मेला. वाईट झालं! पण त्याला कुणी मारला याला पुरावाच नाही. संतरामला गोळी लागली? फार वाईट! पण कुणी मारली याला पुरावा नाही. पंजाब नॅशनल बँकेचा गुरखा मेला! फार फार वाईट झालं! पण मारला कुणी? पुरावा नाही! माझं म्हणणं असं की हा दरोडा ग्यानसिंग, फकीरा, सुरिंदरसिंग, मोहनसिंग आणि चरणसिंग आणि आणखीन कुणीतरी तिघांनी घातला. त्यातले ४ दरोडेखोर मेले. पोलिसांच्या कृती बघा. पोलिसांना त्यांना कोर्टापुढे आणता आले नाहीत? तो हरभजनसिंग–ज्याने फकीराला मारलंन तो–तो म्हणे निर्दोष सुटला. सुटणारच! त्याची या खटल्यात साक्ष होती आणि शिवाय त्याने एक दरोडेखोर मारून टाकलान्. ही पोलिसांच्या कामाची पद्धत आहे! माझं म्हणणं इतकंच आहे, पंजाब पोलिसांना दाखवून द्या की तुमच्या टाळक्यावर कोर्ट आहे! वाटेल त्याला पकडता म्हणजे काय? युवर ऑनर! सत्याच्या, न्यायाच्या आणि हिताच्या दृष्टीने सांगतो की एकही निरपराध फाशी जाता कामा नये! इथे तर तिघे आहेत. माझी विनंती एवढीच की या तिघांची निर्दोष मुक्तता व्हावी.'

आरोपींचे वकील खाली बसले. त्यांचं भाषण ऐकणाऱ्या लोकांच्या मनात चलबिचल झाली! त्यांना वाटलं 'अरेरे! बिचारे उगाच पकडून आणले.' जनता संस्थांवर आणि पोलिसांवर आधीच चिडलेली, तशातच आरोपींच्या वकिलांनी काडी पेटवून दिली. मग काय विचारता? लोक आरोपींकडे सहानुभूतीने पाहू लागले!

न्यायमूर्ती बेदी इतका वेळ शांतपणे आरोपींच्या वकिलांचं भाषण ऐकून घेत होते. आता ते पुढे झुकले आणि त्यांनी सरकारी वकिलांना विचारलं. 'यस्! तुमचं काय म्हणणं आहे?'

आता सरकारी वकील उभे राहिले. 'प्लीज युवर ऑनर! माझ्या वकीलमित्रांच्या अलौकिक वक्तृत्वाबद्दल मला आदर आहे! नुसत्या सुंदर भाषणानी परिस्थिती बदलत नसते. ग्यानसिंगलाच आम्ही माफीचा साक्षीदार का केला? हा काय प्रश्न झाला. माफीचा साक्षीदार कुणाला करायचा हे ठरवायचं असतं सरकारने, आरोपींनी नव्हे! आम्ही २०० माणसं संशयीत म्हणून आणली कबूल! पण तिघांवरच केस का केली? कारण पुरावा आहे म्हणून! ग्यानसिंग धरून १९६ माणसं आम्ही सोडून दिली याचा अर्थच आमची केस खोटी नाही! फिंगर प्रिंट एक्सपर्ट! युवर ऑनर एक्सपर्ट शब्द लक्षात घ्या! तो असं सांगतो की बसच्या मडगार्डवर जगजितसिंगच्या पंजाचा ठसा होता. ग्यानसिंग सांगतो की बस जगजितसिंगनेच चालवली. आणि याचा एक हात म्हणे लुळा आहे! तो बस चालवू शकतो! बंदूक चालवू शकतो आणि हात लुळा? शस्त्रास्त्र तज्ज्ञ असं



दरोडे घालणं हा या तिघांचा धंदा ! त्यांना सोडू नका. मरेपर्यंत फाशी द्या.

बोलला की, 'जगजितसिंगकडे जी बंदूक मिळाली त्याच बंदुकीच्या नळीतून सुटलेल्या गोळीने निर्भयसिंग मेला !' पंच आहेत ! तीच बंदूक पोलिसानी जगजितसिंगाकडून जप्त केली हे त्यांनी प्रत्यक्ष पाह्यलंय. याला ओळख परेडमध्ये ८ माणसांनी ओळखला. ओळख परेडमध्ये १-२ जण तरी चुकलेच पाहिजेत असा कायदा आहे ? एक बंदूक आणि सब–इन्स्पेक्टर शिवप्रसादांचं पिस्तूल मुलाजवळ मिळालं; तर रूराला पकडतानाच मुकेरियन पोलीस स्टेशनची बंदूक मिळाली. पंजाब नॅशनल बँकेच्या शेल्फवर रूराचे ठसे मिळाले. काय पाहिजे आणखी ? ग्यानसिंग खोटं बोलला असता तर मीच नसता का अर्ज केला की 'ग्यानसिंगची माफी रद्द करा' म्हणून ? पण ग्यानसिंग खरं बोलला ! आता याचे बचावाचे साक्षीदार बघू. २९ पैकी १० गुन्हेगार ! जेलमध्ये होते म्हणे. आता बँकेवर दरौडा घालण्यासारखी गोष्ट रूरा आणि ग्यानसिंग काय सगळ्यांच्या देखत बोलतील. आता उरले १९. त्यांनी कबूलच केलं की ते फॅक्टरी ओनर्स आहेत आणि जगजितसिंगचे मित्र आहेत. कसली मैत्री ही ? हा मुख्य मंत्र्यांचा पुतण्या आहे आणि ते फॅक्टरीचे मालक आहेत. माझे वकील मित्र सरकारवर खूप बोललें. मी पण बोलतो. असेल मुख्यमंत्र्यांचा पुतण्या. जर सुटला

तर पंजाब राज्य, राज्य रहाणार नाही, लोकांच्या जिवाची आणि वित्ताची खात्री काय? माझं म्हणणं असं की आरोपींना मानवी जिवाची किंमत नाही! त्यांना काम धंदा नाही! दरोडे घालणं हा त्यांचा धंदा! त्यांना सोडू नका. तिघांनाही मरेपर्यंत फांशीची शिक्षा द्या!'

सरकारी वकिलांचं भाषण संपलं. आणि कोर्टातलं वातावरण पुन्हा बदललं. लोक दरोडेखोरांकडे तिरस्काराने बघू लागले!

न्यायमूर्ती बेदींनी निकालाची तारीख दिली. ११ जुलै १९५७!

११ जुलै १९५७! न्यायमूर्ती बेदींचे कोर्ट तुडुंब भरलं. वृत्तपत्रांचे बातमीदार आणि असंख्य स्त्री-पुरुष आपसात चर्चा करीत होते. आरोपींचं भवितव्य काय? फाशी, जन्मठेप का निर्दोषी! लोकांच्या आपसात पैजा लागल्या.

बरोबर ११ वाजता न्यायमूर्ती बेदी न्यायासनावर बसले. कोर्टात कमालीची शांतता पसरली. सरकारपक्षाचे १६५ आणि बचावाचे २९ साक्षीदार मला कसे दिसले? त्यातले खरे किती? खोटे किती? केस काय आहे? या खटल्यात दोन्ही बाजूंकडून हरकती किती घेण्यात आल्या? मी निकाल काय दिला? हायकोर्ट काय म्हणतं हीच चिकित्सा न्यायमूर्ती आधी करीत बसले! लोक कंटाळले. हे काय? देऊन टाका निकाल! शेवटी संध्याकाळचे ४ वाजले. २५० पानं फुलस्केप जजमेंट झालं. आणि न्यायमूर्तींनी निकाल दिला. आरोपी दोषी आहेत.

१ : हेड कॉन्स्टेबल निर्भयसिंग आणि पंजाब नॅशनल बँकेचा हवालदार यांचा जाणून बुजून आणि हेतु पुरस्सर खून केल्याबद्दल आरोपी रूरा, मुला आणि जगजितसिंग यांना मरेपर्यंत फाशी द्यावे.

२ : मुकेरियन पोलीस स्टेशनचा संत्री संतराम याच्या खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल ७ वर्षे सक्तमजुरी.

३ : चोरी केल्याबद्दल ३ वर्षे सक्तमजुरी.

४ : बस ड्रायव्हरला पिस्तूल दाखवून जबरदस्ती केल्याबद्दल प्रत्येकाला १ वर्ष सक्तमजुरी.

सगळ्या शिक्षा एकदम भोगायच्या आहेत.

न्यायमूर्ती बेदींनी जजमेंटवर सही केली. अंगठ्याचा दाब देऊन टाक मोडून टाकला आणि ते उठून चेंबरमध्ये गेले.

आरोपींनी भर कोर्टात हंबरडा फोडला! हे काय झालं? फाशी!

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात न्यायमूर्ती बेदी, दोन्ही बाजूचे वकील आणि आरोपींचे फोटो आले. वर मथळा होताच, 'पंजाब नॅशनल दरोडा खटल्यात तिघाही आरोपींना फाशी!'

...सदरहू निकालाविरुद्ध तिघाही आरोपींनी अपील केले. ते अपील सुनावणीसाठी आले पंजाब हायकोर्टाचे जज्ज न्यायमूर्ती जी. डी. खोसला आणि न्यायमूर्ती

गुरनामसिंग यांच्या समोर !

...जज्ज निःपक्षपाती असतो असं आपण म्हणतो. पण जज्जसुद्धा माणूस आहे ! त्यालाही मन आहे. प्रत्येक जज्ज आधी वकील असतो. त्यालाही पोलिसांचा अनुभव असतोच. न्यायमूर्ती गुरनामसिंग सुरवातीपासूनच आरोपींच्या दिशेने झुकले. त्यांचं मत पडलं हे काय ? आठ आठ साक्षीदार आरोपींना ओळख परेडमध्ये ओळखतात ? लुटीचा सगळा माल मिळतो ? ४ दरोडेखोर ठार मारले जातात ? ग्यानसिंग पकडला तो डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसने. '४८ तासात बाकीचे आरोपी पकडा ' असा हुकूम दिल्यावर. तो लगेच माफीचा साक्षीदार बनतो. त्याने डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटपुढे केलेल्या पहिल्या अर्जातच तो सांगतो की, पोलिसांनी माझ्याकडून जबरदस्तीने अर्ज लिहून घेतला !' लाल मशीवरची केस पोलिसांनी काढून घेतली तर दरोडेखोराला ठार मारणारा हरभजनसिंग निर्दोष सुटला ! पोलिसांची केस संशयास्पद वाटते. अपील ॲडमिट करावं !

या उलट न्यायमूर्ती जी. डी. खोसला यांचं असं मत पडलं की पोलीस सगळंच काम खोटं करणार नाहीत. अंगुली निर्देशन (Finger Prints) आणि शस्त्रास्त्र तज्ञ हे सायंटीस्ट आहेत. त्यांच्या साक्षी पूर्ण विश्वासार्ह आहेत. पोलिसांनी ४ दरोडेखोर ठार मारले. बरोबर केलं. (They were deserving it) पोलीस त्यांना आधी पकडायला गेले होते ! ते सरळ ताब्यात आले नाहीत म्हणून मारले ! पोलिसांचा हक्क आहे तो ! डॉ. बालकृष्ण हा रिस्पेक्टेबल साक्षीदार आहे. त्याचं आणि दरोडेखोरांचं भांडण नव्हतं. तो कशाला खोटं बोलेल ? अपील फेटाळलं पाहिजे.

झालं ! न्यायमूर्ती खोसला आणि न्यायमूर्ती गुरनामसिंग यांच्यात मतभेद झाला. दोघांनी वेगवेगळी आणि एकमेकांच्या विरुद्ध जजमेंटस् दिली. आरोपींना शिक्षा

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

फाशीची आणि फाशी कायम करावी का नाही ? या मुद्द्यावर दोन हायकोर्ट जज्जांमध्ये मतभेद ! असा प्रकार घडतो तेव्हा हायकोर्टाचा तिसरा जज्ज नेमावा लागतो. दोघांनी झाला प्रकार पंजाब हायकोर्टाच्या चीफ जस्टीस पुढे ठेवला. चीफ जस्टीसने स्वतःच निर्णय द्यायचं ठरवलं....आणि न्यायमूर्ती जी. डी. खोसला बरोबर ठरले. पंजाब हायकोर्टाच्या चीफ जस्टीसने आरोपींचे अपील फेटाळून लावलं आणि त्यांची फाशी कायम केली.

या निर्णयाविरुद्ध आरोपींनी सुप्रीम कोर्टात अपील केलं. सुप्रीम कोर्टात आरोपींचे वकील जोरात होते. त्यांनी सुप्रीम कोर्टाच्या फुल बेंच पुढे आर्ग्युमेंट सुरू केलं. "युवर लॉर्डशिपस् ! मिस्टर जस्टिस गुरनामसिंग पंजाब हायकोर्टाचे जज्ज आहेत ! एका हायकोर्ट जज्जला सुद्धा शंका आली की आरोपी कदाचित निर्दोष असतील. हे तर सुप्रीम कोर्ट आहे. इथे न्याय आणखीन काटेकोर मिळेल. कारण ह्या कोर्टाच्या वर कोर्ट नाही !"

सरकारी वकिलांनी हरकत घेतली. त्यांनी बिनतोड मुद्दा मांडला– "युवर लॉर्डशिपस् ! मला पंजाब हायकोर्टाचे जज्ज न्यायमूर्ती गुरनामसिंग यांच्याबद्दल आदर आहे ! पण ते जसे हायकोर्ट जज्ज आहेत तसेच न्यायमूर्ती जी. डी. खोसला पण हायकोर्ट जज्ज आहेत. त्यांनी आरोपींना दोषी ठरवलंय. एवढच नव्हे तर पंजाब हायकोर्टाच्या चीफ जस्टीसनी पण आरोपींचं अपील फेटाळून लावलं. मी जज्ज साहेबांबद्दल काही बोलत नाही. माझं म्हणणं एवढंच की पुरावा बघा आणि निकाल द्या !"

सुप्रीम कोर्टाच्या फुलबेंचने (५ न्यायमूर्ती) पुराव्याची छाननी केली. आणि... रुरा, मुला, आणि जगजितसिंग यांची फाशी कायम केली.

१९५७ सालच्या सप्टेंबर महिन्यात रुरा, मुला आणि जगजितसिंग या तिघांनाही फाशी देण्यात आले–मरेपर्यंत !

सब-इन्स्पेक्टर शिवप्रसादनी वधस्तंभाकडे पाहिले आणि जीप घेऊन ते ड्यूटीवर निघून गेले !

# समाप्त

---

पंजाब हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती जी. डी. खोसला यांच्या A Judge's Note-book या पुस्तकातील The Mukerian Decoity या प्रकरणाचे स्वैर रूपांतर.

---

## विज्ञानेश्वरी

दत्तप्रसाद दाभोळकर

# विज्ञानेश्वरांची गाय

ज्ञानेश्वरांनी गावातील ब्राह्मणांचे आव्हान स्वीकारले. एका क्षुद्र रेड्याच्या तोंडून त्यांनी त्या ज्ञानजड मूढांना वेदमंत्र ऐकवले. ज्ञानदेवांच्या ज्ञानाचा चैतन्यस्पर्श झाला. एका जड चैतन्यहीन भिंतीत चैतन्य आले. ती भिंत एका अक्राळविक्राळ वाघासमोर जाऊन खंबीरपणे उभी राहिली. ज्ञानदेवांच्या या गोष्टी सत्यकथा असतील. कदाचित रूपककथाही असतील. एक गोष्ट मात्र खरी. ज्ञानाचे, विज्ञानाचे महत्त्व सांगणाऱ्या प्रत्येकाला, प्रत्येक दशकात अशी आव्हाने स्वीकारावी लागतात. सात वर्षांपूर्वी एका आधुनिक विज्ञानेश्वराने असेच एक मजेशीर आव्हान स्वीकारले.

सात वर्षांपूर्वीची गोष्ट. इंग्लंडमधील ' रोठमस्टेड अॅग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट 'मध्ये त्यावेळी एक मजेशीर परिसंवाद भरला होता. परिसंवादाचा विषय होता, 'यांत्रिक गाय दूध देऊ शकेल काय?' परिसंवादात तरुण फ्रँकलीन पुन्हा पुन्हा सांगत होता. 'हे सहज शक्य आहे. आपण त्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. गायीच्या पोटात, गवतावर ज्या रासायनिक क्रिया घडतात त्या आपण या यंत्रात घडविल्या पाहिजेत.' पण परिसंवादात कोणालाच डॉ. एच्. फ्रँकलीन यांचे हे मत पटले नाही. या दृष्टीने प्रयत्न केलेल्या अनेकांना यापूर्वी अपयशाचे धनी व्हावे लागले होते. शेवटी परिसंवादाचे अध्यक्ष प्रिन्सिपॉल पिरिक समारोपाचे भाषण करताना म्हणाले, "डॉ. फ्रँकलीन हा एक कविहृदयाचा तरुण आहे. शास्त्रज्ञ होण्याऐवजी त्याने कवीच बनावयास पाहिजे होते. काही सुंदर कवीकल्पना तो मनाशी बाळगून आहे."— आणि भर सभेत एक चमत्कार घडला. डॉ. फ्रँकलीनने आपण हे आव्हान स्वीकारत असल्याचे जाहीर केले. त्या तरुणाने ती संस्था सोडली. स्वतःच्या हातातील इतर संशोधन बाजूला ठेवले. यांत्रिक गायीपासून दूध मिळविण्याच्या एकाच वेडाने हा तरुण झपाटला गेला. त्यानंतर दोन वर्षे डॉ. फ्रँकलीन एका छोटया घरगुती प्रयोगशाळेत काम करीत होते. या काळात शेंगदाणे, सोयाबीन इत्यादींच्या बियांपासून एका माणसाला पुरेल एवढे दूध ते मिळवू लागले होते. पण डॉ. फ्रँकलीनचे ध्येय याहून खूप मोठे होते. गाय जे जे पदार्थ खाते, ते ते यंत्रात घालून त्यांना गाय देते तेवढे दूध यंत्रापासून हवे होते. या प्राथमिक प्रयोगांचा एक फायदा झाला होता. वृत्तपत्रांचे

व विद्यापीठांचे लक्ष या प्रयोगवेड्या तरुणाकडे वेधले होते. आर्थिक मदतीचा प्रश्न सुटला होता. आज आणखी पाच प्रयोगवेडे तरुण डॉ. फ्रँकलीन यांच्याकडे काम करीत असतात. दिवसाला पंधरा गॅलन वनस्पती दूध देणाऱ्या काही यांत्रिक गायी हे 'गोपाळ' बाळगून आहेत. नुकत्याच एका वृत्तपत्र परिषदेत डॉ. फ्रँकलीन यांनी त्यांची एक नवी गोमाता दाखविली. गाय खाते ते सर्व प्रकारचे गवत, पेंड, भाजीपाला, टरफले असे एक टन वजनाचे खाद्य पदार्थ त्यांनी त्यांच्या या यांत्रिक गायीच्या पोटात ओतले आणि त्या यांत्रिक गायीने वृत्तपत्र प्रतिनिधींना दोनशे गॅलन दूध पुरविले. या वनस्पती दुधात जीवनसत्त्वांची कमतरता नव्हती. –ब्रिटनमधल्या काही डॉक्टरांच्या मते तर हे दूध गायीच्या दुधापेक्षा अधिक उपयुक्त आहे. लंडनमधील काही रुग्णालयात ज्या मुलांना आईचे वा गायीचे दूध पचत नाही, त्या तान्ह्या मुलांना हे वनस्पती दूध देतात. आपल्या यांत्रिक गायीच्या रचनेबद्दल डॉ. फ्रँकलीन अर्थातच फार गुप्तता बाळगून आहेत. त्यांनी वृत्तपत्र परिषदेत दिलेल्या रूपरेषेप्रमाणे निरनिराळ्या प्रकारचे गवत एका करवतीच्या खोक्यात ओतले जाते. त्या खोक्यात अनेक धारदार पाती, दर मिनिटाला तीन हजार फेरे या गतीने फिरत असतात. या खोक्यातून बाहेर पडणारे गवत द्रवरूप बनलेले असते. हे द्रवरूप गवत एका लांब नळकांडीतून बाहेर टाकले जाते. या नळकांड्यात सिलिकाचे व ॲल्युमिनाचे वेगवेगळे थर भरलेले असतात. या नळकांड्यातून बाहेर पडणाऱ्या द्रवरूप गवतामधील चोथा व हिरव्या रंगाचा भाग मागे राहिलेला असतो. हे रंगहीन द्रवरूप गवत नंतर एका तप्त बंदिस्त यंत्रात शिरते. गायीच्या पोटात असलेले सूक्ष्म जीव [Bacteria] त्या यंत्रात ठेवलेले असतात. या सूक्ष्म जिवांची क्रिया झालेले हें रंगहीन द्रवरूप गवत फार मोठ्या दाबाखाली दुसऱ्या एका यंत्रात पाठविले जाते. शेंगदाणे, सोयाबीन, कपाशी यांच्यापासून मिळविलेले तेल या यंत्रात रंगहीन द्रवरूप गवताशी एकजीव केले जाते. त्यानंतर निरनिराळ्या तपमानाच्या क्रिया होत असतानाच समुद्रातील एक प्रकारचे शेवाळे [Irish Moss] व अत्यल्प साखर या दुधात मिसळविली जाते.

अप्रगत देशातील दुधाचा प्रश्न आपल्या मार्गानेच सुटेल असा डॉ. फ्रँकलीन यांचा दावा आहे. त्या देशातील सुगीच्या दिवसात वाळवावी लागणारी ओली वैरण व रस्त्यारस्त्यांवर पडणारे पदार्थ वापरून भरपूर प्रमाणात वनस्पती दूध बनविता येईल. हे दूध खूप दिवस टिकत असल्याने सुगीच्या दिवसात त्याचा साठा करून नंतर ते वापरता येईल. अशा अनेक कल्पना डॉ. फ्रँकलीन बाळगून आहेत. मेक्सिकन सरकारच्या आमंत्रणावरून नुकतेच डॉ. फ्रँकलीन दोनदा मेक्सिकोला जाऊन आले. मेक्सिको शहराजवळ असलेल्या साखर कारखान्यातील उसाच्या पाती फुकट जातात. या फुकट जाणाऱ्या हिरव्या पातीपासून वनस्पती दूध बनविणाऱ्या गायीचे गोठे तिथे उभारण्याचे काम ते आता हातात घेणार आहेत—आजच्या परिस्थितीत आपल्या देशाला वा प्रामुख्याने आपल्या साखर कारखान्यांना डॉ. फ्रँकलीन यांचे

संशोधन किती उपयोगी पडेल हे आपण नक्की सांगू शकणार नाही. मात्र एखाद्या हृटयोग्याच्या प्रयोगाला गर्दी करून, त्याच्यावर पैसे उधळण्यापेक्षा, डॉ. फ्रॅंकलीन सारख्या आधुनिक विज्ञानेश्वराला भारतात बोलावून या विज्ञानेश्वराशीच त्याबाबत प्रत्यक्ष चर्चा करणे आपल्या फायद्याचे ठरणार नाही का?

## डॉ. आमोणकरांचे संशोधन

राजकीय पुढारी आणि जंतुनाशके यांच्यात एक विलक्षण साम्य आहे. राजकीय पुढारी म्हातारे झाले की जनतेवर त्यांचा काही प्रभाव पडत नाही. त्या राजकीय पुढाऱ्यांच्या थापा जनतेच्या अंगवळणी पडलेल्या असतात. जनता त्या

### कृत्रिम हृदय

एक संपूर्ण दुसरे मानवी हृदय वेगळ्या शरीरात बसवावयाचे आमूलाग्र, हृदय परिवर्तनाचे प्रयोग हे अवघड, खर्चिक, गुंतागुंतीचे आहेत. याच प्रश्नाला आणखी एका प्रकारे उत्तर शोधण्याचा आज शास्त्रज्ञ प्रयत्न करत आहेत. या ना त्या रोगाने कमकुवत झालेले हृदय आपले पंपाचे काम नीट करत नाही. संपूर्ण शरीराला ज्या जवनिकेमार्फत रक्त पुरविले जाते ते काम तिला एकट्याला झेपत नाही. तिला मदत आवश्यक असते आणि नाही मिळाली तर पुढचे सगळे त्रास परिणाम बहुधा अटळ असतात.

हा ताण कमी करण्यासाठी हृदयाच्या मदतीला एक पंप हृदयात डाव्या जवनिकेजवळ बसविण्यात प्राण्यांच्यामध्ये तरी शास्त्रज्ञानी यश मिळवले आहे. पंपाची कार्यक्षमता सतत टिकावी म्हणून बॅटऱ्या सतत चार्ज करण्याची सोयही करता येते. यापूर्वीच्या प्रयोगात विद्युत वाहकाच्या तारा छातीला त्वचेमधून आरपार भोक पाडून बाहेर घ्याव्या लागत. त्यामुळे इतर काही धोके कायमचे उद्‌भवत. ही अडचण आता दूर झाली आहे. रोग्याच्या छातीवर एक धातूची पट्टी बसविलेली असते आणि त्याच स्वरूपाची पट्टी त्वचेच्या आतल्या बाजूस एकदाच कायमची बसवून टाकण्यात येते. या दोन पट्ट्यांचा प्रत्यक्ष संपर्क नसतानाही बाहेरील पट्टीमार्फत विद्युतप्रवाहाचे वहन योग्य त्या प्रमाणात व प्रकारे आतील पट्टीच्या द्वारे पंपाला करता येत आणि पंप सतत कार्यक्षम ठेवता येतो. ह्या कृत्रिम पंपाच्या साह्याने हृदयावरचा बराच ताण कमी करून पुढचे दुष्परिणाम टाळता येतात.

आज केवळ सहाय्यक ठरणारा हा पंप उद्याच्या प्रयोगातून संपूर्ण हृदयाचे काम चालविण्याची शक्यताही शास्त्रज्ञ बोलून दाखवतात.

जुन्या थापांना आता बधत नाही. ते जुने पुढारी आता स्वपक्षालाच मारक ठरण्याचा संभव असतो. जनतेला आता नव्या थापा, नव्या भाषेत सांगणारे नवे पुढारी हवे असतात. कीटकनाशकांच्या बाबत नेमके हेच घडते. जसजसे दिवस जातात तशी कीटकनाशके कीटकांच्या अंगवळणी पडतात. आज झुरळांच्या वर डी. डी. टी. चा काही परिणाम होत नाही. आफ्रिकेतील झुरळांची एक जात तर चक्क डी. डी. टी.चा खुराक म्हणून वापर करते! उलट मानवजातीवर मात्र डी. डी. टी. चा अनिष्ट परिणाम होऊ लागतो.

—सांगण्याचा मुद्दा थोडा वेगळा. फक्त कीटकांवरच रामबाण ठरेल असे एखादे नवे कीटकनाशक शोधणे ही आजची एक निकडीची गरज. आहे ती गरज भागविण्याचा एक वेगळा प्रयत्न डॉ. आमोणकर व डॉ. रिव्हीस या कॅली-

---

## संशोधन आणि औषधी कंपन्या

औषधांच्या किमती भरमसाट असतात. कारण संशोधनावर आम्हाला भरमसाट खर्च करावा लागतो, असे परकीय औषधी कंपन्या नेहमी सांगत असतात. परकीय औषधी कंपन्यांच्या या प्रचाराला साधार उत्तर देण्याचे काम डॉ. मायकेल पिअरसन यांनी आपल्या 'मिलियन डॉलर बग्स अँन्ड द ड्रग इंडस्ट्री' या पुस्तकात केलंय. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आपल्या पुस्तकात ते म्हणतात, 'संशोधनावर खूप खर्च होतो हे खरे आहे. केवळ सायनामाइड या एका अमेरिकन कंपनीने साठ सालापर्यंत संशोधनावर चौदा कोटी डॉलर्स खर्च केले होते. एवढा खर्च करून एकही नवे औषध त्यांना मिळाले नाही. शेरिंग या कंपनीने दीड कोटी डॉलर्स खर्च करून पोलिओ-वरचे एक औषध शोधून काढले. पण त्याच्याहून थोडे अधिक गुणकारी औषध बाजारात आल्याने हे संशोधन वाया गेले. सिबाने फक्त हिंदुस्तानात संशोधनासाठी एक कोटी डॉलर्स उडवले. एकही नवे औषध त्यांना मिळाले नाही. हे सारे खरे आहे. पण दुसरी बाजू तेवढीच भक्कम आहे. केवळ 'अरोमायसिन' या एका औषधावर सायनामाइड ही कंपनी वर्षाला पाच कोटी डॉलर्सचा नफा मिळवून जाते. अमेरिकेत, सिबाचे एक मोहिनीऔषध त्यांच्या जगभरच्या संशोधनाची किंमत वसूल करते. शेरिंग ही कंपनी प्रॉगीनॉन या औषधावर आठ हजार पट नफा मिळवते. ही लूट थांबली पाहिजे. आवश्यक औषधांची मक्तेदारी तर नष्ट झाली पाहिजे. 'संशोधना-वर होणारा खर्च उत्पादन खर्चात मिळवावयास परवानगी दिली व मक्ते-दारी संपुष्टात आणली तर औषधांच्या किंमती खाली येऊ शकतील.'— भारताने आज अप्रत्यक्षपणे डॉ. पिअरसन यांचे म्हणणे स्वीकारले आहे.

---

फोर्निया विद्यापीठातील दोन शास्त्रज्ञांनी नुकताच केला आहे. डॉ. आमोणकर या भारतीय शास्त्रज्ञाने एक अधार्मिक गोष्ट केली. त्यांनी चातुर्मासात चक्क लसुणाचे कांदे निवडले. त्याच्यावर काही नवे वेगळे प्रयोग केले. यापूर्वी लसुणीचे अनेक गुणधर्म विज्ञानाला माहीत होते. मोगल व रजपूत पाकशास्त्रात लसुणीचे महत्व सांगितलेले आहे. लसुणीमुळे जेवण रुचकर होत असतानाच आयुष्य वाढते हे पण त्यांनी नमूद केले आहे. प्राचीन वैद्यकशास्त्राने अनेक रोगाविरुद्ध लसूण वापरलेली आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राप्रमाणे लसुणीमधील 'ॲलीसीन' (allicin) हा रासायनिक पदार्थ काही सांसर्गिक रोग बरे करू शकतो. मात्र डॉ. अमोणकरांनी प्रयोग करेपर्यंत लसुणीमधील एखाद्या घटकाचा कीटकनाशक म्हणून उपयोग होईल याची मात्र कोणाला कल्पना नव्हती. डॉ. आमोणकरांनी निरनिराळे रासायनिक द्रव पदार्थ वापरून लसुणीचे अर्क काढले. या अर्काची डासांच्या निरनिराळ्या जातीवर होणारी प्रतिक्रिया अजमावली. एकोल [Methyl Alcohol] वापरून काढलेला अर्क सर्वात अधिक प्रभावी ठरला. त्यानंतर त्यांनी वाफ वापरून लसुणीचे उर्ध्वपतन [Steaw distilation] केले. यावेळी मिळालेला द्रव पदार्थ एकोलाने दिलेल्या अर्काहून पाचपट अधिक प्रभावी ठरला. आज वापरात असलेल्या अनेक कीटकनाशकांच्याहून हा द्रव पदार्थ डासांवर अधिक प्रभाव पाडतो. ज्यावेळी लसुणीच्या अर्कातील नक्की कोणता पदार्थ प्रभावी आहे हे डॉ. आमोणकर आणि डॉ. रिव्हीस शोधून काढतील त्यावेळी एक नवे जंतुनाशक बाजारात येईल. या जंतुनाशकाचा मानव जातीवर कोणताही अनिष्ट परिणाम होणार नाही.

# समाज को बदल डालो

'समाज को बदल डालो' हा चित्रपट पाहिला आणि किंचित काळ का होईना अंतर्मुख झालो. चित्रपट म्हणून त्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. मुळात हा चित्रपट ब्लॅक अँड व्हाईटमध्ये हवा होता, काही वेळा चित्रपट मूळ विषय सोडून वेडीवाकडी वळणे घेतो, त्यातील चित्रण काही ठिकाणी भडक, अतिरंजित वाटते, चित्रपटातील संगीत अगदीच सामान्य आहे...चित्रपट चालतो तितका वेळ मिनिटाला एक याप्रमाणे अशा मोजून दीडशे सूचना करता येतील. आणि तरीही पडद्यावर जे दिसते त्याने आपण बऱ्याच वेळ अस्वस्थ होतो, शीतानुकूल थिएटरमधील मागे कलंडणारी ती सुखावह बैठक बऱ्याच वेळा आपल्याला बोचू लागते. यापुढील भाग आता कदाचित सहन होणार नाही म्हणून काही वेळा वाटते की उठून जावे आणि तरीही आपण बसून राहतो.

हा सारा प्रभाव चित्रपटकथेचा आहे. सध्याच्या समाजस्थितीचे इतके विदारक दर्शन क्वचितच कोठे घडत असेल. ही कथा इतकी भेदक आहे की बऱ्याच वेळा चित्रपट म्हणून आपण त्याकडे पहातच नाही. दिसणाऱ्या दृश्यांच्या संदर्भात याच विषयावरील आपल्या मनातील आंदोलने तपासत आपण चिंतन करीत रहातो. चित्रपटाचा प्रेक्षक ही आपली भूमिका केव्हा नाहीशी होते व हरघडी दिसणाऱ्या, कळणाऱ्या व जाणवणाऱ्या वस्तुस्थितीचा एक भाग, आपल्या समोरच्या दैनंदिन घडामोडीतीलच एक पर्व म्हणून या चित्रपटकथेचा आपण केव्हा विचार करू लागतो हे समजत नाही.

हे सारे या चित्रपटाचे—त्यापेक्षाही कथेचे यशच म्हटले पाहिजे. त्या दृष्टीने कथा आहे तशी मांडणाऱ्या दिग्दर्शक व्ही. मधुसूदन राव यांचेही ते यश ठरते. आणि 'समाज को बदल डालो'चा चित्रपट म्हणून आपण नंतर केव्हातरी विचार करतो तेव्हा मनात येते की हीच कथा यापेक्षाही एखाद्या समर्थ दिग्दर्शकाच्या हाती पडली असती तर एक फार चांगला चित्रपट पहायला मिळाला असता...

कामगार चळवळीत तळमळीने कार्य करणाऱ्या एका कार्यकर्त्याच्या कुटुंबाची झालेली परवड हा या चित्रपटाचा विषय आहे. त्याच्याविरुद्ध उठलेल्या गिरणीमालकाचे अगदी अवास्तव काळेकुट्ट चित्रण हे या कथेतील फार मोठे वैगुण्य आहे. त्यामुळेच चित्रपट जेव्हा गिरणीमालकाच्या बाजूची दृश्ये टिपू लागतो तेव्हा एकदम वेगडी वाटू लागतो. पण कामगार—कार्यकर्ता अजय सहानी याच्या कुटुंबाची कहाणी जेव्हा तो सांगू लागतो तेव्हा अतिशय वास्तव बनतो. त्याच्या कुटुंबावर कोसळणाऱ्या साऱ्या आपत्ती, त्या घटना आपण आजच्या समाजस्थितीत थोड्या फार फरकाने जशाच्या तशा घडताना पाहिलेल्या, ऐकलेल्या असतात. आणि त्यांचा शेवट फारच

विदारक असतो. नवऱ्याच्या खुनानंतर कोठेही थारा न लाभलेली त्याची पत्नी आपल्या तीन मुलांसमवेत विष घेण्याखेरीज दुसरे काय करू शकते? (अशा बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या आपण काय कमी वाचतो?) चित्रपटामध्ये दाखविलेल्या घटना क्रमात आधी त्या कामगार कार्यकर्त्याचा खून आणि शेवटी त्या कुटुंबाचा आत्मघात हा अतिशय वास्तव आहे. त्याखेरीज अशा या कथेमध्ये दुसरे काही घडूच शकणार नाही.

नेहमी सामाजिक विषय रंजकतेत घोळवून सांगणाऱ्या जेमिनीने अशी भयानक शोकांत कथा पडद्यावर आणावी हे कौतुकास्पदच. कदाचित या चित्रपटाच्या दाक्षिणात्य भाषांमधील आवृत्तींच्या यशामुळे त्यांना ही प्रेरणा मिळाली असावी. पण त्याहूनही विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे दिग्दर्शकाने ही कथा आहे तशी पडद्यावर मांडली आहे. त्यात उगाचच मसाला भरला नाही. किंवा तो रंजकतेच्या पातळीवर नेला नाही. या कथेचा हा दृश्यपट कदाचित प्रभावाच्या दृष्टीने अधिक परिणामकारक झाला नसेल, परंतु मूळ कथेची तीव्रता, भेदकता त्यांनी फारशी कमी केली नाही ही गोष्टच खूप झाली. साफ सांगायला हरकत नाही की जेमिनीकडून या असल्या चित्रपटाची अपेक्षा नव्हती.

या श्रेयाचे मानकरी आहेत दिग्दर्शक व्ही. मधुसूदन राव, प्रमुख अभिनेत्री शारदा आणि मुख्य अभिनेता अजय सहानी. झोपडपट्टीतील एका साध्या गिरणीकामगाराचे जीवन दिग्दर्शकांनी अतिशय वास्तव व म्हणूनच प्रभावी दाखविले आहे. कामगाराच्या घरातले वातावरण, वागणे सारे अस्सल आहे. त्यावर कडी केली आहे कामगाराच्या आईच्या भूमिकेतील शम्मीने. सतत वरच्या पट्टीत, एकाच तालात संवाद बोलण्याची विक्षिप्त म्हातारीची शैली तिने बेमालूम उचलली आहे, त्याबरोबरच अंतरीचा जिव्हाळाही चांगला व्यक्त केला आहे.

दाक्षिणात्य भाषांमधील या चित्रपटाच्या आवृत्तींमध्ये शारदा हिनेच भूमिका केली होती. तिला काय किंवा अजय सहानीला काय रोमँटिक ग्लॅमर मुळीच नाही. त्यामुळे कामगारकुटुंबातील दोन सामान्य जीव म्हणून ते खरेखुरे दिसतात व वागतातही तसेच. चित्रपटाच्या अखेरीस कथा जसजशी अधिकाधिक शोकाकूल होते, तसतसे शारदाचे भावदर्शनही अधिक गहिरे झाले आहे. आपल्याच मुलांना विष घालण्याच्या प्रसंगी तिने व्यक्त केलेली जिवाची घालमेल बराच काळ लक्षात राहील.

गेल्या तीनचार आठवड्यात हिंदी चित्रपटातला एक नवा विशेष ध्यानात आला. तो म्हणजे या चित्रपटांतून आता वेगळ्या प्रकारच्या कथा हाताळल्या जाऊ लागल्या आहेत. 'पवित्र पापी', 'प्रिया', 'दो दुनी चार' नंतर आलेल्या 'समाज को बदल डालो'मध्येही हीच गोष्ट घडली आहे. हिंदी चित्रपटांमध्ये हे नवे धाडस आहे. नव्या प्रवाहाची ही जर नांदी ठरेल तर... ?

—मुंबईकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649



"चूक ! ते बसल्येत ते सरकारी कर्मचारी; न् इकडे येताहेत ते आहेत व्यापारी..."

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**